




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २६१ ■ मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


## महाराणी ताराराणी या जैन समूदायाच्या

**मुंबई :** जैन मुनी आचार्य नयन पद्मसागर यांच्या एका वक्तव्याने वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. महाराणी ताराराणी या जैन समूदायच्या असल्याचं वादग्रस्त वक्तव्य त्यांनी केलं. औरंगजेबचा नाश करण्यासाठी जैन महाराणी असलेल्या ताराराणींचा जन्म झाला असं वक्तव्य आचार्य नयन पद्मसागर यांनी केलं. मुंबईतील जैन समूदायाच्या एका कार्यक्रमात त्यांनी हे वक्तव्य केलं. छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर महाराणी ताराराणी यांनी २५ वर्षे औरंगजेबशी लढा दिला आणि त्याला जेरीस आणलं. ताराराणी या स्वराज्याचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या कन्या होत्या. पुढे जाऊन त्यांनी कोल्हापूरच्या गादीची स्थापना केली.

# आरोग्य विभागाची जिल्हा परिषदेवर ‘ सर्जिकल स्ट्राईक ’

## ▸▸प्रशासकीय अपयश झाकण्यासाठी खोट्या अफवांचा आधार
## ▸▸आरोग्य मंडळाच्या उपसंचालकांचे खरमरीत पत्र !

प्रतिनिधी ३१ मार्च

**अकोला:** शिक्षक बदली प्रक्रियेतील संशयास्पद दिव्यांग प्रमाणपत्रांच्या फेरतपासणीवरून आरोग्य विभाग आणि जिल्हा परिषद प्रशासन यांच्यातील वाद आता विकोपाला गेला आहे. आरोग्य उपसंचालक कार्यालयाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांना अत्यंत कडक शब्दांत पत्र लिहून, आरोग्य विभागाची प्रतिमा मलीन केल्याबद्दल कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.

आरोग्य उपसंचालक डॉ. सुशीलकुमार वाकचौरे यांनी पत्राद्वारे जिल्हा परिषद प्रशासनाचे वाभाडे काढले आहेत. जिल्हा परिषद प्रशासन स्वतःची निष्क्रियता लपवण्यासाठी प्रसारमाध्यमांमध्ये चुकीची विधाने करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. २६८ संशयास्पद शिक्षकांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यासाठी वारंवार सूचना देऊनही, जिल्हा परिषद प्रशासन वारंवार 'त्रुटीपूर्ण आणि अपूर्ण' फाईल्स पाठवत आहे. जिल्हा परिषदेने मूळ कागदपत्रे आणि केंद्रनिहाय चौकशीचा तपशील सादर केलेला नाही. ही प्रक्रिया केवळ रेंगाळत ठेवून दोषी शिक्षकांना वाचवण्याचा हा प्रयत्न असल्याचे पत्रात नमूद केले आहे.



शिक्षक बदली घोटाळा...!

१८ जून २०२४ च्या बदली धोरणानुसार जिल्हा स्तरावर आधी पडताळणी करणे ही जिल्हा परिषदेची जबाबदारी होती. मग ९ महिने बीईओ आणि शिक्षणाधिकारी काय करत होते? असा रोखठोक सवाल आरोग्य विभागाने विचारला आहे. आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे की, ६ मार्च २०२६ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेने आधी स्वतःच्या स्तरावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथील 'स्थाई वैद्यकीय मंडळा'कडून या कर्मचाऱ्यांची फेरतपासणी करून घ्यावी. त्यानंतरच अपिलीय अधिकारी म्हणून आरोग्य उपसंचालक कार्यालय विचार करेल.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत पत्राच्या प्रती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, प्रधान सचिव आणि विभागीय आयुक्तांना पाठवण्यात आल्या आहेत. जर यापुढे आरोग्य विभागाच्या कार्यक्षमतेवर चुकीची विधाने केली, तर थेट कायदेशीर कारवाई केली जाईल, असा सज्जड दमही आरोग्य विभागाने दिला आहे. या पत्रामुळे जिल्हा परिषद वर्तुळात मोठी खळबळ माजली असून, संशयास्पद दिव्यांग शिक्षकांचे धाबे दणाणले आहेत.

### अन्यथा, जनहित याचिका दाखल करु.....



सन २०२५-२६ च्या शिक्षक बदली प्रक्रियेतील कथित महाघोटाळ्याने आता गंभीर वळण घेतले आहे. मुख्य तक्रारदार आणि युवा सामाजिक कार्यकर्ते गणेश गजाननराव कुरई यांनी जिल्हा परिषद प्रशासनाने ९ महिने जाणीवपूर्वक दिरंगाई करून गुन्हेगारांना अभय दिल्यास सर्वांविरुद्ध उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा देण्यात आला आहे. जिल्हा परिषदेच्या संशयास्पद फाईल्स अवैध ठरवून परत पाठवल्या असतानाही, प्रशासन 'प्रस्ताव आरोग्य विभागाकडे आहेत' अशी खोटी माहिती देऊन शासन आणि लोकप्रतिनिधींची दिशाभूल करत असल्याचा आरोप कुरई यांनी केला आहे. गेल्या नऊ महिन्यात ७ गटशिक्षणाधिकाऱ्यांना वारंवार नोटिसा देऊनही त्यांनी अहवाल सादर केले नाहीत. या अधिकाऱ्यांचे निलंबन प्रस्ताव केवळ कागदावर फिरवून त्यांना पुराव्यांशी छेडछाड करण्यासाठी वेळ दिला जात आहे. सर्व्हर डेटा आणि आयटी कंपनीची चौकशी जाणीवपूर्वक दडपली जात असल्याचा संशय तक्रारदाराने व्यक्त केला आहे. या घोटाळ्याचे 'मुख्य सूत्रधार' म्हणून जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावाचा समावेश करून उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात येईल. तसेच या प्रकरणाची सविस्तर तक्रार 'लाचलुचपत प्रतिबंधक विभाग' कडे करण्यात येईल, असा इशाराही युवा सामाजिक कार्यकर्ता कुरई यांनी दिला आहे.

# आता होर्मुझमधून ये-जा करणाऱ्या जहाजांकडून टोल वसुली !

वृत्तसंस्था ३१ मार्च

**तेहरान :** युद्धासारख्या संकटाच्या काळातही इराणने मोठा नफा कमावण्याची संधी शोधून काढली आहे. इराणच्या संसदेच्या सुरक्षा समितीने होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या व्यापारी जहाजांकडून टोल आकारण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. होर्मूझ अमेरिकेसमोर उभे ठाकलेल्या इराणच्या या नव्या नवीन निर्णयाचा भारतावर मोठा परिणाम होईल आणि पुरवठा साखळीत संकट निर्माण होण्याची भीती आहे.

इराणचे सरकारी माध्यम आयआरआयबीनुसार, होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांकडून टोल वसूल करण्यासाठी एक पद्धतशीर प्रणाली स्थापित करण्याचा इराणी सरकारचा मानस असून या योजनेत सागरी सुरक्षा, जहाजांची सुरक्षितता आणि पर्यावरण संरक्षणाला प्राधान्य दिले जाईल तर, इराणच्या या निर्णयामुळे भारतासारख्या देशांसमोरील अनेक आव्हाने वाढतील.

अमेरिकन आणि इस्त्रायली जहाजांच्या मार्गावर या योजनेत स्पष्ट बंदी घालण्यात आली असून इराण आणि त्यांच्या सशस्त्र दलांच्या सार्वभौम भूमिकेला बळकटी देण्यात आली आणि सामुद्रधुनीसाठी कायदेशीर चौकट स्थापित करण्याकरिता ओमानसोबत सहकार्याची रूपरेषा मांडण्यात आली आहे. या व्यतिरिक्त इराणविरुद्ध एकतर्फी निर्बंधांमध्ये सहभागी असलेल्या देशांच्या मार्गावरही बंदी घालण्यात आल्याचे आयआरआयबीने सांगितले.



### डोनाल्ड ट्रम्प यांचे तळ्यात-मळ्यात विधान

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तेहरानने होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडली नाही, तर इराणच्या वीज प्रकल्प, तेल विहिरी आणि खारग बेटासह नागरी ऊर्जा पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्याची धमकी दिल्यानंतर होर्मुझ मोठ्या प्रमाणात बंद राहिले तरीही इराणविरुद्धची अमेरिकेची लष्करी मोहीम संपवण्यास तयार असल्याचे ट्रम्प यांनी आपल्या सहकाऱ्यांना सांगितल्याचे वृत्त समोर आले आहे.

### भारताच्या १८ जहाजांना होर्मुझमधून वाट मिळेना

पश्चिम आशियातील घटनांच्या परिणामावर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव, राजेश कुमार सिन्हा म्हणाले की, १८ भारतीय ध्वज असलेल्या जहाजांपैकी तीन एलपीजी टँकर, एक एलएनजी वाहून नेणारे जहाज आणि चार कच्चे तेल वाहून नेणारे टँकर आहेत. तसेच एका रिकाम्या टँकरमध्ये एलपीजी पुन्हा भरला जात असून त्यावर ४८५ खलाशी असल्याची माहितीही सरकारने दिली. पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर अरुंद सामुद्रधुनीत अडकलेल्या सुमारे ५०० जहाजांपैकी ही जहाजे आहेत.

# रूपाली चाकणकरांचा जबाब नोंदविणार !

## अशोक खरात प्रकरण ; आजी माजी ट्रस्टींची चौकशी होणार

प्रतिनिधी ३१ मार्च

**नाशिक :** नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात याला उद्या (१ एप्रिल) कोर्टात हजर केले जाणार असून पोलिस कोठडीचा शेवटच्या दिवस आहे. त्यामुळे आजचा दिवसभर अशोक खरात विरोधात आणखी पुरावे गोळा करून तपासला वेग दिला जाणार आहे.

अशोक खरात याच्यावर दाखल असलेल्या महिलांच्या लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांसंदर्भात खरातचे ओकस कार्यालयामध्ये एसआयटीकडून सोमवारी काही महत्वाचे पुरावे जप्त करण्यात आले आहेत. तसेच आज रूपाली चाकणकरांसह शिवनिका संस्थानच्या आजी-माजी ट्रस्टींची चौकशी होणार आहे.

अशोक खरातचा मोबाईल डेटा रिकव्हर करुन या आधीचे चॅटिंग, कोणाशी जास्त वेळा संभाषण केले. कोणाच्या संपर्कात होता काय संभाषण केले याबाबतीत एसआयटी माहिती गोळा करत आहेत. त्यातून नवीन कोणती माहिती समोर येणार, याचा शोध सुरू असून तपासाचा तपशील उद्या कोर्टात हजर केला जाणार आहे. त्यामुळे आज दिवसभरात काय तपास होतो याकडे लक्ष लागले आहे. दरम्यान, अशोक खरात प्रकरणात जास्त चर्चेत राहिल्या राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर आज नाशिकमध्ये जबाब नोंदवण्यासाठी येतात का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. रुपाली चाकणकर यांच्यासह शिवनिका संस्थानच्या आजी माजी ट्रस्टींची खरात प्रकणारत चौकशी होणार आहे. अत्याचार प्रकरणात खरातचा तपास सुरू असताना शिवनिका संस्थानच्या कारभाराची देखील चौकशी होणार आहे. काल रुपाली चाकणकर चौकशीसाठी येणार असल्याची चर्चा होती. मात्र रुपाली चाकणकर यांनी आजारपणाचे कारण देत चौकशी टाळल्याची माहिती समोर येत आहे.

# चेंगराचेंगरीत; ९ भाविकांचा मृत्यू

**नालंदा :** बिहारमधील नालंदा येथे मंगळवारी सकाळी शीतला मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ९ भाविकांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत अनेक जण जखमी झाले असून, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. दीपनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मघडा शीतला मंदिर येथे ही घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, मंदिरात झालेली प्रचंड गर्दी आणि नियोजनाचा अभाव यामुळे ही मोठी दुर्घटना घडली. घटनेनंतर तातडीने मदत आणि बचाव कार्य सुरू करण्यात आले आहे. आतापर्यंत आठ भाविकांचा मृत्यू झाल्याचं समोर आलं आहे. मघडा येथील शीतला मंदिरात दर मंगळवारी दर्शनासाठी हजारो भाविक येत असतात. या मंगळवारी सुरक्षा व्यवस्था पूर्णपणे कोलमडलेली पाहायला मिळाली. दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती आणि त्याच दरम्यान काही कारणास्तव चेंगराचेंगरी झाली.

# अश्विनी भिडे मुंबईच्या पहिल्या महिला आयुक्त ?



प्रतिनिधी ३१ मार्च

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या आयुक्तपदी कुणाची नियुक्ती करावी, या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी सायंकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीमध्ये प्रामुख्याने अश्विनी भिडे , मिलिंद म्हैसकर आणि असीम गुप्ता यांच्या नावाची चर्चा झाल्याचे समजते. त्यानंतर अश्विनी भिडे यांनी शिंदे यांची त्यांच्या नंदनवन या निवासस्थानी भेट घेत अर्धा तास चर्चा केली. या भेटीगाठींनंतर भिडे यांचा आयुक्तपदाचा मार्ग मोकळा झाल्याचे समजते.

मुंबई महापालिका आयुक्तपदाच्या शर्यतीत प्रामुख्याने अश्विनी भिडे, मिलिंद म्हैसकर आणि असीम गुप्ता या तिघांची नावे आघाडीवर होती. याविषयी रात्री उशिरापर्यंत चर्चा सुरू होती. मात्र, नाव निश्चित ठरले नव्हते. मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी हे आज, मंगळवारी सेवानिवृत्त होत असल्याने रिक्त होणाऱ्या या पदावर कोणाला नेमायचे, याविषयी रस्सीखेच सुरू आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांच्या कार्यालयात काम करणाऱ्या अश्विनी भिडे यांच्या नावासाठी, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या नगरविकास विभागात अतिरिक्त मुख्य सचिव असीम गुप्ता यांच्या नावासाठी आग्रह धरला होता. मात्र, सोमवारी रात्री आधी फडणवीस-शिंदे यांच्यात चर्चा झाली. त्यानंतर भिडे यांनी शिंदे यांच्या निवासस्थानी जाऊन अर्धा तास चर्चा केल्यानंतर आयुक्तपदाच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याचे समजते.


### कोण आहेत अश्विनी भिडे?

अश्विनी भिडे या १९९५च्या बॅचच्या आयएएस अधिकारी असून, त्यांनी आतापर्यंत विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. सध्या त्या मुख्यमंत्री कार्यालयात अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून कार्यरत आहेत. शिवाय त्या मुंबई मेट्रो प्रकल्पाच्या व्यवस्थापकीय संचालकपदाची जबाबदारीही सांभाळत आहेत. त्यांच्या कामकाजाची दखल घेत त्यांना 'मेट्रो वूमन' म्हणून ओळख मिळाली आहे.

# आ. शिवतारेंना लेकीने किडनी दान करून दिले नवजीवन !

प्रतिनिधी ३१ मार्च

**पुणे :** पुरंदरचे आमदार विजय शिवतारे यांच्यावर किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया झाली. कन्या डॉ. ममता शिवतारे यांनीच विजय शिवतारे यांना एक किडनी दान करत त्यांचे प्राण वाचवले. मुंबईतील खासगी रुग्णालयात ही प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पार पडली. त्यानंतर डॉ. ममता यांचे पती आणि आयपीएस अधिकारी शिवदीप लांडे यांनी बायकोसाठी भावनिक पोस्ट लिहिली आहे. गेल्या काही वर्षांपासून किडनीविकाराच्या त्रासामुळे विजय शिवतारे यांना डायलिसिसद्वारे उपचार देण्यात येत होते. सोमवारी त्यांच्यावर



शस्त्रक्रिया झाली असून विजय शिवतारे आणि ममता शिवतारे या दोघांचीही प्रकृती स्थिर आहे. मृत्यूशी झुंज देणाऱ्या आपल्या पित्याला नवजीवन देण्यासाठी ममता यांनी स्वतःची किडनी दान केल्यानंतर शिवदीप लांडेही भावविवश झाले आहेत. त्यांनी 'एक्स' सोशल मीडियावर पोस्ट लिहित भावना व्यक्त केल्या आहेत.

### शिवदीप लांडे यांची पोस्ट काय?

गौरी, आयुष्यात अनेक अडचणी आल्या, संकटं कोसळली आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीसुद्धा मला कधीच विचलित करु शकली नाही - मी नेहमीच अविचल राहिलो. पण तुझ्या एका निर्णयाने... फक्त एका निर्णयाने मला हलवून सोडलं. जेव्हा तू तुझी किडनी दान करण्याचा निर्णय/निश्चय केलास, तुझ्या वडिलांना नवीन जीवन देण्याचा तो निर्णय. तुझ्या वडिलांप्रति असलेल्या तुझ्या निःस्वार्थ समर्पणाला, त्यागाला आणि चिकाटीला माझा सलाम. नतमस्तक.







# राष्ट्रवादी काँग्रेसचा कणाच नव्या संविधानातून गायब ?

प्रतिनिधी ३१ मार्च

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील संविधानात राष्ट्रीय अध्यक्षाचे अधिकार राष्ट्रीय कार्याध्यक्ष यांना मिळण्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आरोप केलेल्या प्रकरणात आणखी काही धक्कादायक खुलासे समोर आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील संविधानात आणखी काही बदल केल्याची बाब समोर आली आहे. पक्षाचा कणा असणारे अल्पसंख्याक सेल, सामाजिक सेल आणि ओबीसी सेल नवीन संविधानातून काढून टाकण्यात आले आहेत.

एकत्रित राष्ट्रवादीच्या संविधानात एकूण ७ फ्रंटल सेल नमूद करण्यात आल्याचे समोर आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नव्या संविधानात केवळ युवक, विद्यार्थी, महिला आणि सेवादल या सेलचा समावेश असल्याचे उघड झाले आहे. २८ फेब्रुवारीला पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडीदरम्यान पक्षाकडून निवडणूक आयोगाला जे मिनिट्स पाठवण्यात आले त्यात संविधानात बदल करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे.

सिटी न्यूज अमरावती

मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## अर्जुन नगरातील नर्सरीच्या फार्म हाऊसला आग

**अमरावती :** अर्जुन नगर येथे भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. आगीने काही वेळातच मोठा फैलाव घेतल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. महापालिकेच्या अग्निशामक दलाची बंब या ठिकाणी पोहचली असून पोलीसही दाखल



झाली आहे. आग विझविण्याचा प्रयत्न सुरू आहे. आप नेमकी कशी लागली सध्या कळले नाही.

सदर आग एका शैक्षणिक संस्थेच्या शेतीमध्ये असलेल्या फार्म हाऊसला लागल्याची माहिती आहे



आज दिनांक ३० मार्च रोजी माजी खासदार नवनीत रवि राणा यांनी नवी दिल्ली संसद भवन मध्ये लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेऊन विविध विषयावर चर्चा केली.

# महानगरपालिकेचा ८७६ कोटी २६ लाखांचा अर्थसंकल्प

## ♦ स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर आज करणार सादर

प्रतिनिधी ३१ मार्च

**अमरावती:** स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर यांनी आज महानगरपालिकेच्या सभागृहात ८७६ कोटी २६ लाखाचा अर्थसंकल्प सादर केला.

यावेळी सभागृहात महापौर श्रीचंद तेजवानी , उपमहापौर सचिन भेंडे, महापालिका आयुक्त सोम्या शर्मा त्यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, विविध समितीचे सभापती, व सर्व नगरसेवकप् नगरसेविका उपस्थित होते. यावेळी सत्ताधारी पक्ष, व विरोधकांमध्ये दिवसभर चांगलीच विविध प्रश्नांवरून जुगलबंदी ही रंगली.

सन २०२५-२६ चा सुधारीत व सन २०२६-२७ चा मुळ अंदाजपत्रक प्रशासनाने स्थायी समितीला सादर केला.

त्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार स्थायी समितीला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार स्थायी समितीने आवश्यक तेथे उत्पन्न व खर्चामध्ये फेरबदल करुन रु.८७६ कोटी २६ लक्षाचा अर्थसंकल्प तयार केलेला आहे. एकुण प्रस्तावित खर्च रु. ७११ कोटी ६ लक्ष असुन रु.१६५ कोटी २० लक्ष शिल्लक दर्शविलेला आहे.





सदर अर्थसंकल्पास स्थायी समितीने दि. २४-०३-२०२६ च्या सभेत मंजुरी दिलेली आहे. स्थायी समितीने मंजुर केलेला अर्थसंकल्प निवेदनासोबत सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर केला.

प्रशासनाने प्रस्तावित अर्थसंकल्पातील महसुलात सुरुवातीची शिल्लक रु.३ कोटी ८४ लक्ष आणि महसुली उत्पन्न रु.४३३ कोटी ८३ लक्ष असे एकुण रु.४३७ कोटी ६६ लक्ष उत्पन्नाचे व एकुण महसुली खर्च रु.४३७ कोटी २४ लक्ष नमुद करुन रु. ४२ लक्ष शिल्लकीचे अंदाजपत्रक स्थायी समिती समोर सादर केले होते.

स्थायी समितीने मालमत्ता कर तसेच इतर महसुलातुन मिळणारे उत्पन्नामध्ये रु. २१ कोटी ७८ लक्षाची वाढ सुचविली आहे. त्यामुळे प्रशासनाने दर्शविलेली महसुली शिल्लक रु. ४२ लक्ष व स्थायी समितीने उत्पन्नामध्ये सुचविलेली वाढ रु.२१ कोटी ७८ लक्ष असे एकुण रु.२२ कोटी २० लक्ष निधी अतिरिक्त स्वरुपात उपलब्ध झाला आहे. त्यात स्थायी समितीने सोबत जोडलेल्या परिशिष्टाप्रमाणे एकुण २५ लेखाशिर्षात महसुली खर्चामध्ये रु.२६ कोटी २० लक्षाची वाढ तर काही लेखाशिर्षात रु.५ कोटी ७४ लक्षाची घट दर्शविलेली आहे. स्थायी समितीने महसुली उत्पन्न व खर्चामध्ये दर्शविलेल्या घट व वाढीचा विचार करता रु.४५९ कोटी ४४ लक्षाचे महसुली उत्पन्न व रु.४५८ कोटी ७५ लक्षाचे महसुली खर्च प्रस्तावित करुन अखेरची महसुली शिल्लक रु.६९ लक्ष इतके दर्शविलेली आहे.

स्थायी समितीने शिफारस केलेल्या सन २०२६-२७ चे प्रस्तावित अर्थसंकल्पीय

प्रारंभिक शिल्लक रुपये १७० कोटी ४३लक्ष (ज्यात महसुली शिल्लक रु.३ कोटी ८४ लक्ष, भांडवली शिल्लक रु.१५१ कोटी ६६ लक्ष व असाधारण ऋण व निलंबन रु.१४ कोटी ९३ लक्ष) असुन सन २०२६-२७ मधील एकुण उत्पन्न रुपये ७०५ कोटी ८३ लक्ष (ज्यात महसुली उत्पन्न रु.४५५ कोटी ६० लक्ष, भांडवली उत्पन्न रु.२२९ कोटी ४३ लक्ष व असाधारण ऋण व निलंबन उत्पन्न रु. २० कोटी ८० लक्ष) असे एकुण प्रारंभिक शिल्लक धरुन एकुण उत्पन्न रु.८७६ कोटी २६ लक्ष असुन सर्व बाबीवर एकुण खर्च रुपये ७११ कोटी ०६ लक्ष (ज्यात महसुली खर्च रु.४५८कोटी ७५ लक्ष, भांडवली खर्च रु.२३१ कोटी ५० लक्ष व असाधारण ऋण व निलंबन खर्च रु.२० कोटी ८० लक्ष) वजा जाता वर्ष अखेर शिल्लक रुपये १६५ कोटी २० लक्ष (महसुली शिल्लक रु. ६९ लक्ष, भांडवली शिल्लक रु. १४९ कोटी ५८ लक्ष व असाधारण ऋण व निलंबन शिल्लक रु.१४ कोटी ९३ लक्ष) एवढी अपेक्षित आहे.

## फोरेझेन डे लाईट आईस्क्रीम पार्लर वर भरोसा सेल पथकाची कारवाई

### ♦ असभ्यवर्तन करताना युवक - युवतीना पकडले

प्रतिनिधी ३१ मार्च

**अमरावती :** कठोरा मार्गावर असलेल्या फोरेझेन डे लाईट आईस्क्रीम पार्लर वर दामिनी पथक व भरोसा सेलच्या महिला पोलीस अधिकाऱ्यांनी कारवाई करून असभ्यवर्तन करणाऱ्या युवक - युवतींना ताब्यात घेतले आहे.

ही कारवाई आज सायंकाळी दरम्यान करण्यात आली.


पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली भरोसा सेलच्या पोलीस निरीक्षक दीप्ती ब्राह्मणे व त्यांच्या पथकाने ही



कारवाई केली आहे.

गेल्या दोन दिवसापासून शहरात अशा धडाकेबाज कारवाया सुरू आहेत. त्यामुळे असभ्य वर्तन करणाऱ्या प्रेमियुगोलांचे धावे दणाणले आहेत.

## अमरावतीत विजेचा कडकडाटांसह अकाली पावसाचे आगमन



प्रतिनिधी ३१ मार्च

**अमरावती :** सायंकाळी सात वाजता दरम्यान अमरावती जिल्ह्यात विजेच्या गडगडासाठी ठिकाणी पावसाचे आगमन झाले आहे. त्यामुळे उखड्याच्या गर्मीपासून नागरिकांना थोडा दिलासा मिळाला असला तरी अकाली पावसामुळे नागरिकांची धावपळ झाली आहे.

खारतळे गाव परिसरात सौम्य स्वरूपात गारपीट झाल्याची घटना ची माहिती आहे.

## ईचा नागी येथील महादेव संस्थानात यात्रा महोत्सव साजरा

प्रतिनिधी ३१ मार्च

**मंगरुळपीर:** वाशीम जिल्ह्याच्या मंगरुळपीर तालुक्यातील 'ब' वर्ग तीर्थक्षेत्र असलेल्या ईचा- नागी येथील श्री क्षेत्र महादेव संस्थानमध्ये बारस उत्सव मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात पार पडला. 'हर हर महादेव' च्या जयघोषात हजारो भाविकांनी शेंडीने गाडे ओढत आपला नवस फेडला. यावेळी संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला होता.

ईचा - नागी येथे बारस निमित्त यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात येते. नवस केलेले भाविक या यात्रेत शेंडीने गाडे ओढून आपली मनोकामना पूर्ण झाल्याबद्दल



कृतज्ञता व्यक्त करतात. शेकडो वर्षांची ही परंपरा पाहण्यासाठी यंदाही मोठ्या संख्येने भाविकांनी गर्दी केली होती. यात्रेनिमित्त भाविकांसाठी ५१ क्विंटल महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी एक वाजल्यापासून महाप्रसाद वितरण सुरू करण्यात आले असून या वेळी हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. भाविकांच्या सोयीसाठी संस्थानच्या वतीने उत्तम नियोजन करण्यात आले होते. थंड व शुद्ध पिण्याचे पाणी, बसण्याची सुसज्ज व्यवस्था, तसेच स्वच्छतेवर विशेष भर देण्यात आला होता. या सर्व व्यवस्थेसाठी सुमारे एक हजार महिला व पुरुष स्वयंसेवकांनी अहोरात्र सेवा दिली.

## पी. आर. पोटे पाटील अभियांत्रीकीच्या विद्यार्थ्यांना सीओईपीच्या भाऊ फौंडेशनमध्ये सर्वोत्तम म्हणून पारितोषिके

प्रतिनिधी ३१ मार्च

**अमरावती :** कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे (सीओईपी) येथे भाऊ फौंडेशनच्यावतीने आयोजित राष्ट्रीय स्तरावरील इग्रेटर इनव्होटर ऑफ इंडिया या स्पर्धेत स्थानिक पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयातील विविध विभागातील विधार्थ्यांनी एक प्रथम, एक सर्वोत्तम आणि एक इनोव्हेटिव्हमध्ये सर्वोत्तम पारितोषीक असे सर्व मिळून ३ पारितोषिके पटकावून सुयश प्राप्त केले.

पुणे येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, टेकनॉलॉजिकल विद्यापीठ, पुणे याचे भाऊ फाऊंडेशनच्यावतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते. हि प्रोजेक्ट स्पर्धा एकून ५ स्तरांमधून होत असते, प्रत्येक स्तरातील प्रत्येक फेरी एलिमिनेशन फेरी होती यामध्ये संपूर्ण भारतातून अनेक अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी आपल्या नवनवीन संकल्पना आणि प्रतिकृती मधून मांडत असतात. ही स्पर्धा दि. २४ व २५ मार्च २०२६ रोजी सीओईपीच्या भाऊ फौंडेशनमध्ये आयोजित करण्यात आली असता पी. आर. पोटे पाटील महाविद्यालयातील एकूण ०५



चमूंनी भारतातील टॉप ३० संकल्पना मध्ये सहभाग नोंदविला होता. ज्यामध्ये १) स्मार्ट योगामॅट फॉर प्रॉपर योगसाधना २) नवजात बालकांच्या लसीकरणासाठी वेळेवर स्मरणपत्रांसह डिजिटल केअरचा प्रभावी वापर ३)पाथफाइंडर: अभियांत्रिकी संधींचे भाकीत ४) कोशफिन (योजना आणि गृह वित्त विषयक ज्ञान): भारताच्या सूक्ष्म अर्थव्यवस्थेला सक्षम करणे ५) फ्लोट अँड फ्लो : ग्रीन एनर्जी ग्रिड यांचा समावेश होता. या सर्वामधून महाविद्यालयाने सर्व सेक्टरमधून एकूण ३ पारीतोषिक प्राप्त केली. दरम्यान संपूर्ण महाराष्ट्रातून प्रथम म्हणून एन्ट्रप्रेनर सेक्टर मध्ये चि. आदित्य सदाफळे आणि कू. मनस्वी वानखडे, इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकी यांनी पारितोषिक मिळवले व इनोव्हेटिव्ह कॉन्सेप्ट बाय इंनोवेटर कॉलेज म्हणून पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती यांना संपूर्ण महाराष्ट्रातून सर्वोत्तम कामगिरी करणारे महाविद्यालय म्हणून गौरवण्यात आले. सर्व ६ क्षेत्रांमधील सर्वोत्कृष्ट सर्वांगीण प्रकल्प म्हणून एचएचएच सेक्टरमध्ये चि. वेदांत जांभळीकर, चि. विशाल जांभेकर, चि. ललित भाडे, चि. यश साखरकर यांनी संगणक अभियांत्रिकी (एआयएमल) चमूला पारितोषिक मिळाले. या संपूर्ण ५ फेझेस करिता महाविद्यालयाचे प्राध्यापक प्रभारी म्हणून प्रा. अक्षय प्र. पुंडकर यांनी सतत मार्गदर्शन आणि परिश्रम घेतले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री श्री प्रवीण पोटे पाटील, उपाध्यक्ष श्री श्रेयशदादा पोटे पाटील, संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य डॉ. मोहम्मद झुहेर, विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. एस. के. नंदा, त्याप्रमाणे सर्व विभाग प्रमुख, डीन्स, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर व अधिकारी व कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचाली करीता शुभेच्छा दिल्या.

## हवामान अनुकूल शेतीसाठी जिल्ह्यांत 'डिजिटल शेतीशाळा'

### ♦ १ एप्रिलपासून तज्ज्ञांमार्फत शेतकऱ्यांना शास्त्रोक्त मार्गदर्शन

प्रतिनिधी ३१ मार्च

**अमरावती:** हवामानातील वाढती अनिश्चितता, पावसाचा खंड आणि नैसर्गिक आपत्तींमुळे पारंपारिक कोरडवाहू शेती संकटात सापडली असून उत्पादन खर्च वाढत आहे. यावर मात करण्यासाठी कृषी विभागांतर्गत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामार्फत महाराष्ट्र राज्याकरिता ठहवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियानठ डिजीटल शेतीशाळा सुरू केली आहे.

हे अभियान शेतीचा उत्पादन खर्च कमी करणे आणि प्रतिकूल परिस्थितीतही शेतकऱ्यांच्या उत्पन्नाची हमी देणे या उद्देशाने राबविण्यात येत आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी कृषी विभागाबरोबरच, कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे, उमेद, माविम, पशुसंवर्धन विभाग इ. यंत्रणादेखील सहभागी होत आहेत. या अभियानाचा एक टप्पा म्हणजे हवामान अनुकूल तंत्रज्ञानावर आधारित विशेष डिजिटल शेतीशाळांचे आयोजन. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि पानी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एप्रिल २०२६ महिन्यात चार विशेष डिजिटल शेती शाळा' आयोजित करण्यात येत आहेत.

शेतकरी, महिला गट, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे सदस्य, कृषी मंडळे, बिजोत्पादक, फार्मर कप स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणारे निमंत्रक व शेतकरी गट, वनपट्टे धारक या सर्वांनी मोठ्या संख्येने डिजिटल शेती शाळांना जॉईन व्हावे, असे आवाहन कृषी विभाग आणि नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामार्फत प्रसिध्दी पत्रकाव्दारे करण्यात येत आहे. राज्यातील सर्व प्रकारच्या पिक पद्धतींना उपयुक्त असणाऱ्या तंत्रांची माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विद्यापीठे आणि कृषी विभागातील तज्ञ आणि प्रगतशील शेतकरी यांचेमार्फत या डिजिटल शेतीशाळामध्ये ज्ञानाचे आदान प्रदान होणार आहे.

## आत्मनिर्भर व प्रगत अमरावतीच्या निर्मितीचा संकल्प- गटनेता चेतन गावंडे

प्रतिनिधी ३१ मार्च

**अमरावती :** अमरावती महानगरपालिकेचे सन २०२५-२६ चे सुधारित आणि २०२६-२७ चे मूळ अंदाजपत्रक हे खऱ्या अर्थाने 'आत्मनिर्भर आणि प्रगत अमरावती' च्या निर्मितीचा संकल्प करणारे आहे, अशी प्रतिक्रिया सभागृह नेते व माजी महापौर चेतन गावंडे यांनी व्यक्त केली आहे.

अमरावती महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पात शहराचा समतोल विकास आणि सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करण्यावर विशेष भर देण्यात आला असल्याचे त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी बोलताना . गावंडे म्हणाले की, ठहे अंदाजपत्रक केवळ आकड्यांचा खेळ नसून अमरावतीच्या शाश्वत विकासाचा एक ठोस 'रोडमॅप' आहे. यामध्ये नागरी सुविधा, आरोग्य, शिक्षण आणि पायाभूत सुविधांना प्राधान्य देतानाच, महिला, बालक, युवक आणि दिव्यांग बांधवांच्या हिताचे रक्षण करण्यात आले आहे.

**अंदाजपत्रकाची प्रमुख वैशिष्ट्ये आणि संकल्प:**

**पर्यावरणपूरक वाहतूक:** 'पीएम ई-बस' योजनेच्या माध्यमातून शहरात प्रदूषणमुक्त सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बळकट केली जाईल.

**स्वच्छ व सुंदर अमरावती:** घनकचरा व्यवस्थापन आणि श्एघ्ञ्ण्‌ च्या सहकार्याने शहराच्या स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लावून अमरावतीला देशातील एक सुंदर शहर बनवण्याचा आमचा मानस आहे.

**डिजिटल प्रशासन:** 'ई-गव्हर्नन्स'वर भर देऊन महापालिकेचे कामकाज अधिक पारदर्शक आणि गतिमान केले जाणार आहे.

**पायाभूत व आरोग्य सुविधा:** शहरातील रस्ते, शाळा आणि आरोग्य केंद्रांचे आधुनिकीकरण करून शेवटच्या घटकापर्यंत गुणवत्तापूर्ण सेवा पोहोचवण्याचा संकल्प या अर्थसंकल्पातून दिसून येतो.

सर्व समाजघटकांच्या हिताचा आणि सामान्य जनतेच्या संकल्पांची पूर्तता करणारा हा अर्थसंकल्प अमरावतीला विकासाच्या एका नवीन उंचीवर नेऊन ठेवेल, असा विश्वास मी व्यक्त करतो, असेही चेतन गावंडे यांनी यावेळी सांगितले.

सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

## अणणाभाऊ साठे स्मारक समितीच्या साखळी उपोषणाला काँग्रेसचा जाहीर पाठिंबा

प्रतिनिधी ३१ मार्च

**खामगाव:** येथील रेल्वे स्टेशनच्या मुख्य प्रवेशव्दाराच्या बाजूला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा कायमस्वरूपी बसवून सौंदर्यीकरण करण्यात यावे यासह इतर मागण्यांसाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक समिती व समस्त मातंग समाज बांधवांचे नगर परिषद समोर साखळी उपोषण सुरू आहे. या उपोषणाला ३० मार्च रोजी खामगाव काँग्रेस पक्षाच्या वतीने जाहीर पाठींबा दर्शविण्यात आला.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आज सकाळी १२ वाजता उपोषणस्थळी भेट दिली. यावेळी पाठींबा बाबतचे पत्र उपोषणकर्त्यांना देवून आपल्या मागण्या रास्त असून शासनाने तातडीने मागण्या मान्य करून न्याय





द्यावा अशी मागणी करण्यात आली. तसेच न्याय मिळेपर्यंत समाजासोबत ठामपणे उभे राहणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. त्यानंतर नगर परिषद नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना मागण्यांबाबत लेखी निवेदन देण्यात आले. निवेदनात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची साहित्यातील ख्याती ही आंतरराष्ट्रीय स्तरावरची आहे. त्यांच्या साहित्यामुळे शोषित, वंचित आणि पिडीतांच्या वेदनेला वाचा फोडलेली आहे. त्यामुळे रशिया सारख्या देशाने सुद्धा त्यांचा पुतळा बसून गौरव केलेला आहे. या अनुषंगाने आपल्या खामगाव नगरीमध्ये साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा असायला पाहिजे, गेल्या २० - २२ वर्षांपासून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसविण्यात यावा अशी मागणी केल्या आत आहे. मात्र सदर मागणीची पूर्तता अद्याप पावतो झालेली नाही. मात्र अज्ञातांकडून खामगाव रेल्वे स्टेशनच्या प्रवेशद्वारावर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसविल्याची घटना सध्या चर्चेत आहे आणि सदर पुतळा कायमस्वरूपी बसवून त्याचं सौंदर्यीकरण करावं यासाठी नगरपरिषदेच्या प्रवेशद्वारावर उपोषण सुद्धा सुरू आहे. समाजातील युवकांनी अण्णाभाऊ साठे प्रती असणारा आदर आणि अस्मिता या भावनेतून ही मागणी केली आहे. सदर प्रकरणी प्रशासनाने लक्ष घालून अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा आपल्या शहरात असला पाहिजे, त्यासाठी कोणती कायमस्वरूपी आणि सन्मानजनक व्यवस्था करता येऊ शकते याबाबतीत तोडगा काढून योग्य तो न्याय करावा अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी खामगाव विधानसभा मतदार संघ समन्वयक ज्ञानेश्वरदादा पाटील, तालुका अध्यक्ष तेजेंद्रसिंह चौहाण, ओबीसी विभागाचे सचिव अजय तायडे, धनंजय देशमुख, जिल्हा काँग्रेस कमिटी संघटन सचिव अतुल सिरसाट, जिल्हा काँग्रेस कमिटी सरचिटणीस संजय तायडे, जिल्हा कांग्रेस उपाध्यक्ष जुलकर नैन शेख चांद, खामगाव शहर अध्यक्ष स्वप्निल ठाकरे पाटील, शहर कार्याध्यक्ष किशोरआप्पा भोसले, अल्पसंख्याक आघाडी शहर अध्यक्ष बबलू पठाण, ॲड.अविनाश इंगळे, सोपान लाहुडकार, प्रकाश इंगळे, युवक काँग्रेस अध्यक्ष अचलेश्वर दिपके, कैलास फाटे, गोपाळ चव्हाण, आशिफ शेख, कैलास साबे, आकाश पाटील, विनोद माळवंदे, असलम पटेल, कृउबास संचालक प्रमोद चिंचोळकार, संताराम तायडे, पुंडलीक तायडे, सै.जाफर यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

सिटी न्यूज अकोला
मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी संघटित व्हा : प्रशांत डिक्कर

**तेल्हारा:** दहिगाव येथे महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या नवीन शाखेची स्थापना करण्यात आली. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत डिक्कर यांच्या हस्ते फीत कापण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यादरम्यान उपस्थितांना संबोधित करताना प्रशांत डीक्कर म्हणाले की संस्थापक अध्यक्ष छत्रपती संभाजीराजे यांच्या नेतृत्वाखाली स्वराज्य पक्ष राज्यभर आपली पाळमुळे घट्ट करीत आहे.

शेतकरी आणि शेतमजुरांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी कामाचा कार्यकर्ता रस्त्यावर उतरून लढत आहे. गाव तेथे शाखा आणि घर तेथे शिवविचार पोहोचविण्यासाठी युवक सक्रिय झाल्याचा दावा केला जातो आहे.

## बनावट आधारकार्डावर बालविवाह करण्याचा प्रयत्न फसला; ‘चाईल्डलाईन’ची सतर्कता

**अकोला:** बार्शीटाकळी नजिकच्या एका गावात बनावट आधारकार्डावर एका अल्पवयीन मुलीचा विवाह करण्याचा प्रयत्न चाईल्डलाईन व काही स्वयंसेवी संस्थांच्या सतर्कता व जलद कार्यवाहीमुळे फसला. बार्शीटाकळी पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या एका गावात १७ वर्षीय मुलीचा विवाह २४ वर्षीय तरुणासोबत होणार असल्याची माहिती चाईल्ड लाईन, ‘अॅसेस टू जस्टीस’, आय. एस. डब्ल्यू. एस. यांना मिळाली. त्यांच्या टीमने धाडसी कारवाई करत हा विवाह तत्काळ थांबवला. या घटनेत मुलीचे आधीच्या आधारकार्ड वय १७ वर्ष असताना ते वाढवून बनावट कार्ड तयार केल्याचे आढळले. टीमने तत्काळ पोहोचून पालकांना ग्रामपंचायत कार्यालयात आणले. संबंधितांना बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ बद्दल माहिती देऊन बाल विवाहाचे दुष्परिणाम समजावून सांगितले. त्यानंतर प्रकरण अकोला येथील बाल कल्याण समितीसमोर मांडण्यात आले. समुपदेशन आणि कडक इशारा देऊन बाल कल्याण समितीसमोर दोन्ही पक्षांची बैठक घेण्यात आली.

# अकोटला वादळी वाऱ्याचा अचानक तडाखा

### ◆ वीज खंडित, काही ठिकाणी पावसाची हजेरी

वि.प्रतिनिधी ३१ मार्च

**अकोट :** अकोट शहरासह ग्रामीण भागात सोमवारी सायंकाळच्या सुमारास अचानक वादळी वाऱ्याने जोरदार हजेरी लावली. अचानक आलेल्या या वाऱ्यामुळे नागरिकांची एकच धांदल उडाली असून अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्याने काही काळ अंधाराचे साम्राज्य निर्माण झाले.

सदर वादळी वाऱ्याचा वेग मोठ्या प्रमाणात असल्याने शहरातील काही भागात वीजतारा तुटल्याच्या घटना घडल्या असल्याची माहिती समोर येत आहे. परिणामी वीज वितरण व्यवस्थेवर ताण निर्माण होऊन अनेक परिसरात वीजपुरवठा खंडित झाला. अचानक वीज गेल्याने नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागला.

दरम्यान, काही भागात वादळी वाऱ्यासोबत हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊसही पडल्याचे नागरिकांनी सांगितले. या पावसामुळे वातावरणात काही प्रमाणात गारवा निर्माण झाला असला तरी वाऱ्याच्या तडाख्यामुळे झाडांच्या फांद्या तुटणे, किरकोळ नुकसान होण्याच्या घटनाही घडल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

वादळाच्या पार्श्वभूमीवर महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने दुरुस्तीची कामे हाती घेतली असून वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. अचानक बदललेल्या हवामानामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज व्यक्त होत आहे.

## कुटासा परिसराला वादळी वाऱ्याचा तडाखा



प्रतिनिधी ३१ मार्च

**कुटासा:** कुटासा, चोहोट्टा बाजार येथे वादळी वाऱ्यासह पावसाचा तडाखा बसला. वाऱ्यामुळे वीट भट्ट्यांवरील राखळ रस्त्यावर उडून धुळीचे साम्राज्य निर्माण झाले. तसेच कुटासा कावसा रोडवर मोठ्या काट्या पडल्याने या रोडवरील वाहतूक काही काळ ठप्प पडली होती. तर पोलीसांच्या मदतीने या रोडवरील काट्या हटवून वाहतुक सुरळीत करण्यात आली. सध्या पाऊस सुरू असून वाहतूक सुरळीत झाली आहे.

## अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करा - आमदार नितीन देशमुख

प्रतिनिधी ३१ मार्च

**पातूर:** अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना शासकीय मदत द्यावी, अशी मागणी आमदार नितीन देशमुख यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी यांना पत्र पाठवून लक्ष वेधले आहे. या पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, अकोला जिल्ह्यातील अनेक भागात अवकाळी पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः फळबागा आंबा लिंबू टरबूज खरबूज गहू, हरभरा, कांदा भाजीपाला यांसारख्या पिकांना फटका बसला असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.आमदार देशमुख यांनी प्रशासनाला निर्देश दिले की, संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्वरित शेतात जाऊन पंचनामे करावेत व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत जाहीर करावी. तसेच कोणत्याही शेतकऱ्याला मदतीपासून वंचित ठेवू नये, याची खबरदारी घेण्याचेही त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने जलदगतीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करत आमदार देशमुख यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे आवाहन प्रशासनाला केले आहे.

## निधन वार्ता

### रमाबाई मांडेकर

**अकोला :** शिवाजीनगरातील रहिवासी श्रीमती रमाबाई रामभाऊ मांडेकर यांचे आज सकाळी वयाच्या १०४ व्या वर्षी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा यात्रा ३१ मार्च रोजी सायंकाळी पाच वाजता श्री राजेश्वर मंदिराच्या मागील त्यांच्या निवासस्थानाहून निघणार आहे. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे.



## अवैध दारूविक्री व जुगार अड्ड्यांविरोधात ग्रामस्थांचे अधिकाऱ्यांना निवेदन सादर

### ◆ न्याय न मिळाल्यास १ मे पासून उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी ३१ मार्च

**कुटासा:** अकोट तालुक्यातील कावसा बु. व कावसा खु. तरोडा या गावांमध्ये सुरू असलेल्या अवैध देशी-विदेशी दारूविक्री तसेच वरली (जुगार) अड्ड्यांविरोधात ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाकडे कठोर कारवाईची मागणी केली आहे. या संदर्भात महिला शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक तसेच दारूबंदी विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन सादर करून तात्काळ कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

गावातील सामाजिक वातावरण बिघडत आहे. विशेषतः महिला, लहान मुले व मुलींवर या परिस्थितीचा विपरीत परिणाम होत असून अनेक कुटुंबे आर्थिक व मानसिक अडचणीत सापडत असल्याचे ग्रामस्थांनी निवेदनात नमूद केले आहे.यापूर्वीही दिनांक ६ मार्च २०२३ रोजी दहिहांडा पोलीस ठाण्यात निवेदन देऊन कारवाईची मागणी करण्यात आली होती. मात्र अद्यापही अवैध धंदे सुरूच असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तसेच १८ मार्च २०२६ रोजी रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास निला उमेश वानखडे या महिलेने पतीच्या दारूच्या व्यसनाला कंटाळून विहिरीत उडी घेतल्याची गंभीर घटना घडल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

योग्य पावले उचलली नाहीत तर १ मे महाराष्ट्र दिनी जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे उपोषण करण्यात येईल तसेच लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नाची जबाबदारी प्रशासनावर राहील, असेही ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे स्पष्ट केले आहे. या निवेदनासोबत ग्रामपंचायत कावसा बु. व कावसा खु. यांचा दारूबंदी ठराव, महिला बचत गटाचा ठराव, ग्रामस्थांच्या सह्यांची प्रत तसेच संबंधित एन.सी.ची प्रत जोडण्यात आली आहे. सदर निवेदनावर रमाई महिला संघ, त्रिरत्न प्रबोधन मंच, बुद्धविहार समन्वय महासंघ अकोला, राष्ट्रीय लोक आंदोलन, निर्भय बनो आंदोलन अकोला आदी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत. निवेदन देताना ग्रामपंचायत सदस्य उषा वानखडे, शीला पोहकार, विशाखा वानखडे, अलका वानखडे, यमुनाबाई वानखडे, पद्मा वानखडे, सुमित्रा वानखडे, पंचफुला निखाडे, शोभा इंगळे, स्वप्न बगाडे, सुनिता डोंगरे, सामाजिक कार्यकर्ते मनोहर वानखडे, तंटामुक्ती अध्यक्ष विठ्ठल तळी, सामाजिक कार्यकर्ते हरिदास लोणकर, गजानन कदम, मोतीराम गायकवाड, धम्मबोधी डोंगरे अनुप बुटे तसेच समाजसेवक गजानन हरणे आदी मान्यवर निवेदन देतात उपस्थित होते.

## पुष्करणा समाजातील नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

प्रतिनिधी ३१ मार्च




**अकोला:** पुष्करणा समाज महाराष्ट्रात अल्प असून भारतीय जनता पक्षाने आठ नगरसेवकांना तिकीट देऊन विजयी केले. त्यांनी कर्तृत्वाचा व समाजसेवेचा वसा कायम ठेवून समाज आणि हिंदू संघटन मजबूत करण्यासाठी काम करावे असे आवाहन अखिल भारतीय पुष्करणा सेवा परिषदेचे पदाधिकारी पीबीएसचे संस्थापक गोपाल पुरोहित यांनी केले.

अकोला पुष्करणा चेतना समिती तसेच युवाशक्ती च्या वतीने स्थानिक भाटिया वाडी येथे पुणे ,वसई विरार, मीरा भाईंदर महानगरपालिकेतील नगरसेवक रवी पुरोहित, मधुसूदन पुरोहित , चंद्रप्रकाश पुरोहित तसेच खामगाव नगरपालिका मध्ये उपाध्यक्ष म्हणून सौ. संतोष चंद्रशेखर पुरोहित, पुलगाव भाजपा नगरपालिका गटनेचे प्रवीण पणीया, खामगाव नगरपालिकेत सौ. गायत्रीदेवी सत्यनारायण थानवी, सौ. रिता मनोज व्यास धामणगाव रेल्वे तसेच तेल्हारा नगरपालिका मध्ये नगरसेविका म्हणून निवडून आलेल्या सौ. भक्ती दीपक छांगाणी यांचा सत्कार तर समाजातील जेष्ठ नागरिक नटवरलाल पुरोहित, माजी सभापती अर्जुन थानवी, जुगल किशोर थानवी, प्रा. शामसुंदर बोहरा, श्रीमती कुसुमदेवी बोहरा, किसन गोपाल पुरोहित, हरी इच्छा, तारादेवी पुरोहित, श्रीमती आशादेवी जोशी, विजयकुमार जोशी, गोपाल पुरोहित, सुशीलादेवी थानवी, कांतादेवी बोहरा यांचा समाज भूषण म्हणून सन्मानित करण्यात आले. तर आर्किटेक इंजिनियर म्हणून विशेष प्राविण्य प्राप्त खुशी पुरुषोत्तम बिस्सा यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा उद्योजक अनिल थानवी हे होते.

मंचावर चंद्रशेखर पुरोहित , कांतीलाल व्यास, महेंद्र पुरोहित, कमलेश पुरोहित, श्यामसुंदर बोरा, विजय व्यास, अशोक छागाणी, जीपी जोशी, सुरेश व्यास अजय व्यास नकुल बोरा, दिलीप छान गाणी, शिवरतन पुरोहित, एडवोकेट वीरेंद्र व्यास, सौभाग्यवती दुर्गा व्यास जया पुरोहित, आधी प्रामुख्याने मंचावर विराजमान होते. वेदपाठी ब्राह्मण सौरभ छांगाणी , पुखराज छांगाणी, महेश जोशी ,अजय जोशी, गिरीराज पुरोहित, चंदन व्यास, हितेश छांगाणी, कन्हैया छांगाणी यांच्या मंत्रोच्चाराने परिसर दुमदुमला. विशेष पूजा अर्चना त्यांनी केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गिरीश जोशी यांनी केले. याप्रसंगी रवी पुरोहित, चंद्रशेखर पुरोहित, रिता व्यास, प्रवीण पणीया, शामसुंदर बोहरा यांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन एड. महेंद्र पुरोहित, तर आभार प्रदर्शन गोपेश बोरा यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धर्मेश पुरोहित गिरीश छागाणी, विनय जोशी, सतीश जोशी, शिवा व्यास, विशाल पुरोहित शक्ती पुरोहित, दीपक छांगाणी, निलेश थानवी, दिनेश जोशी, हरीश जोशी, मधुरम थानवी, नंदकिशोर व्यास, जितेंद्र पुरोहित, अमित व्यास, डॉ. आनंद छागाणी, तुषार पुरोहित, रिंकू छांगाणी, पिंटू छांगाणी यांनी परिश्रम घेतले.

## श्री संत साईबाबा नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा शपथविधी

प्रतिनिधी ३१ मार्च




**मुर्तीजापुर:** भागदार भवनात संत साईबाबा नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांची शपथविधी कार्यक्रम झाला. नरसिंगच्या विद्यार्थ्यांनी रुग्ण कल्याणसाठी एक जबाबदारी म्हणून स्वीकारून शपथ घेतली.

रुग्णसेवा ही ईश्वर सेवा मानली जात आहे म्हणून या सेवा पुढील भविष्यात करणारे नवनिर्वाचित विद्यार्थ्यांचे कौतुक डॉ. अभिषेक तिडके यांनी केले. नर्स म्हणजे रुग्णालयाचा सर्वोच्च भाग आहे रुग्णांना मानसिक आधार व औषधोपचार देऊन रुग्णांची सेवा प्रधान करून नरसिंगच्या विद्यार्थ्यांनी विश्वास प्राप्त करून रुग्णांना नेहमी त्यांना मदत व सहकार्याची भावना ठेवून कार्य करण्याचा सल्ला डॉक्टर शुभम अवघाते यांनी दिला आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर मेहंदी हुसेन यांनी सर्व मान्यवरांचे शाल आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली डॉक्टर शुभम अवघाटे डॉक्टर अभिषेक तिडके कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक दिवाकर गावंडे सागर कोरडे समाजसेवक कैलास महाजन समाजसेवक शेख इमरान शेख खलील संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर मेहंदी हुसेन नगरसेवक बंटी पिंपळे पत्रकार अन्वर खान विलास वानखडे नेहरु युवा मंडळ रमेश दर्यानी अनिता पजई संगीता सरतकार गोपीनाथ टाले रामा खंडारे प्राचार्य संध्याताई टेकाळे विदर्भ स्कूलचे प्राचार्य एम एस बिरादर, इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.कर्तबगार नर्सिंगच्या विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र व मोमेंट देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहन सवाने व संस्कृती थोरात यांनी केले तर आभार तकी हुसैन यांनी केले

## जीतापूर खेडकर येथे नवीन ट्रान्सफॉर्मर उभारणी

प्रतिनिधी ३१ मार्च



**मुर्तीजापुर :** जीतापूर खेडकर येथे गावाच्या वीजपुरवठा व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी गावातील सरपंच सदस्य तसेच गावकरी मंडळी यांच्या सामूहिक प्रयत्नाने गावामध्ये नवीन ट्रान्सफॉर्मरची उभारणी करण्यात आली. या कामाबद्दल महावितरणच्या अभियंता व कर्मचाऱ्यांचा ग्रामपंचायत कार्यालयामार्फत सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ग्रामपंचायतीतर्फे गावाबाबत माहिती देण्यात आली. नवीन ट्रान्सफॉर्मर उभारणीबद्दल माना कक्षाचे कनिष्ठ अभियंता श्री पवन पातालबंसी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच माना कक्षातील प्रधान तंत्रज्ञ येवलकर अक्षय कांबळे, आशिष अवघड, विशाल चौधरी, श्री उमेश उडाखे व श्री गोदे या महावितरणच्या कर्मचाऱ्यांचा देखील पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी प्रधान तंत्रज्ञ श्री येवलकर यांनी माना कक्षाच्या कार्यपद्धतीबाबत माहिती दिली. तर कनिष्ठ अभियंता पवन पातालबंसी यांनी आपल्या मनोगतात पीएम अजय योजनेअंतर्गत गावाच्या विकासासाठी नवीन ट्रान्सफॉर्मर उभारण्यात आल्याचे सांगितले. तसेच कोणतीही योजना यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत व ग्रामस्थांचे सहकार्य अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले व सर्व गावकऱ्यांचे आभार मानले. यावेळी सरपंच श्रीमती. पद्माताई चंद्रमणी वानखडे यांनी महावितरण कर्मचाऱ्यांनी गावाला दिलेल्या विशेष सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमाला जीतापूर खेडकर गावाच्या सरपंच सौ. पद्माताई चंद्रमणी वानखडे, उपसरपंच सौ. वंदना नाकट, सदस्य सुधाकर तायडे, माजी सरपंच विलास खेळकर, अरविंद खेळकर, उमेश खेळकर, तेजस खेळकर, विठ्ठल नाकट, अनिल तायडे, सिद्धार्थ डोंगरे, बाळकृष्ण निकम, श् पंकज बोळे, निलेश वानखडे तसेच ग्रामस्थ व महावितरण कर्मचारी या सर्वांचे सहकार्य लाभले.

## अकोट बसस्थानक चोरट्यांचे ‘सॉफ्ट टार्गेट’; सोन्याची पोत लंपास, प्रवाशांत भीतीचे वातावरण

वि.प्रतिनिधी ३१ मार्च

**अकोट:** अकोट येथील एसटी बसस्थानक परिसर सध्या चोरट्यांसाठी ‘सॉफ्ट टार्गेट’ ठरत असून, एकामागून एक घडणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे प्रवाशांमध्ये तीव्र घबराट पसरली आहे. नुकत्याच घडलेल्या प्रकारात सावरगाव दाभाडे येथील एका महिलेच्या गळ्यातील सुमारे ३६ ग्रॅम सोन्याची पोत अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित महिला अकोट-जळगाव जामोद या बसमध्ये चढत असताना ही घटना घडली. सायंकाळच्या वेळेस बसस्थानकावर असलेल्या गर्दीचा फायदा घेत चोरट्याने क्षणार्धात त्यांच्या गळ्यातील सोन्याच्या पोतीवर डल्ला मारला. घटनेनंतर महिलेच्या लक्षात हा प्रकार येताच एकच खळबळ उडाली. याप्रकरणी अकोट शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, अकोट बसस्थानकावर महिलांच्या गळ्यातील दागिने, तसेच पर्समधील रोकड व मौल्यवान वस्तू चोरीला जाण्याच्या घटनांचे सत्र सुरूच असल्याचे दिसून येत आहे. यापूर्वीही खंडाळा येथील एका महिलेचे सोने चोरीला गेले होते. त्यानंतर अकोलखेड येथील अंगणवाडी सेविकेलाही अशाच प्रकारचा फटका बसला होता. या सर्व घटनांची नोंद पोलीस दप्तरी असली तरी अद्याप एकाही प्रकरणात ठोस सुगावा लागलेला नाही. वारंवार घडणाऱ्या या प्रकारांमुळे बसस्थानक परिसरात पोलिसांची गस्त आणि सुरक्षाव्यवस्था अपुरी असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली आहे. ‘चोरट्यांनी पोलिसांना एकप्रकारे खुले आव्हान दिले आहे का?’ असा सवालही उपस्थित होत आहे. परिणामी प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून विशेषतः महिला प्रवासी अधिक सतर्कतेने वावरताना दिसत आहेत.

या पार्श्वभूमीवर संबंधित गुन्ह्यांचा सखोल तपास करून आरोपींना लवकरात लवकर अटक करावी, तसेच बसस्थानक परिसरात पोलिसांची गस्त वाढवून सीसीटीव्ही यंत्रणा अधिक सक्षम करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

## माजी सरपंचाचा हृदयविकाराने मृत्यू

प्रतिनिधी ३१ मार्च



**अकोला:** गॅस सिलिंडर घेण्यासाठी आलेले माजी सरपंचाचा गर्दीत उभे असताना मृत्यू झाल्याची चर्चा असली तरी प्रत्यक्षात त्यांचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शंकरराव फपुर्डाजी शिरसाट राहणार अन्वी मिर्झापूर हे २८ मार्च रोजी दुपारी २.३० वाजताच्या सुमारास गोरक्षण रोडवरील यदुराज गॅस एजन्सी येथे घरगुती गॅस सिलिंडर घेण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने ते जवळच असलेल्या डॉ. श्रेयस अग्रवाल यांच्या दवाखान्यात स्वतः गेले. डॉ. अग्रवाल यांनी प्राथमिक तपासणी करून नातेवाइकांना माहिती दिली व रुग्णास हृदयविकाराचा झटका आल्याची शक्यता व्यक्त करत तातडीने रुग्णालयात दाखल करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार नातेवाइकांनी त्यांना अकोला शहरातील सर्वोपचार रुग्णालय येथे दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी दुपारी सुमारे ४.३० वाजता त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने मृत घोषित केले. दरम्यान, या घटनेबाबत खदान पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता, शंकरराव शिरसाट हे ज्या वेळी गॅस एजन्सीवर आले त्या वेळी त्या ठिकाणी कोणतीही गर्दी किंवा रांग नसल्याचे दिसून आले. तसेच मृतक हे उन्हात किंवा रांगेत उभे असल्याचेही आढळले नाही. यामुळे गर्दीत उभे राहिल्याने मृत्यू झाल्याच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला असून, याप्रकरणी पुढील तपास खदान पोलिस करीत आहेत.


## कार्यालय नगर पंचायत महागांव, जि. यवतमाळ

### जाहीर निविदा सुचना 2025 - 26

नगर पंचायत महागाव यांच्यावतीने निविदा मोहरबंद, द्विलिफाफा पद्धतीने योग्य त्या वर्गातील अधिकृत विक्रेते/महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नियम अन्वये संस्था नोंदणीच्या वैध दाखला/ईच्छुक विद्युत कंत्राटदाराकडून कोटेशन पद्धतीने निविदाचे दर मागवण्यात येत आहे. सदर कामाकरिता कोरे निविदा कंत्राटदाराकडून कोटेशन पद्धतीने निविदाचे दर मागवण्यात येत आहे. सदर कामाकरिता कोरे निविदा प्रपत्र दि. 01/04/2026 ते दि. 08/04/2026 पर्यंत न.प. सा.प्र.वी. कार्यालयीन वेळेत मिळतील. सदर कामाची निविदा अनामत रक्कमेसह दि. 08/04/2026 रोजी दुपारी 5.00 वाजे पावेतो नगर पंचायत महागाव येथे सादर करावी.

| अ.क्र. | कामाचे नांव | प्रपत्रक किंमत | निविदा अनामत |
|---|---|---|---|
| 1 | नगर पंचायत कार्यालय व परिसरात CCTV कॅमेरे बसविणेबाबत. | 500 | 2000 |

शर्ती व अटी
1) निविदे संबंधिचे अटी व शर्ती कार्यालयात कोरी निविदा प्रपत्रसोबत पोहावयास मिळेल.

अध्यक्ष
न.प. महागाव

उपाध्यक्ष
न.प. महागाव

मुख्याधिकारी
न.प. महागाव

नपम/जा.क्र./3/7/26 दि. 30/3/2026

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त 'सामाजिक समता सप्ताह' राबविणार

## ८ ते १४ एप्रिल विविध कार्यक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी ३१ मार्च

**यवतमाळ :** महाराष्ट्र शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह राज्यभर साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. ८ एप्रिल ते १४ एप्रिल, २०२६ या सात दिवसांमध्ये सामाजिक न्याय, समता आणि संविधानाच्या मूलभूत तत्त्वांवर आधारित कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या आदेशानुसार प्रत्येक कुटुंबाला भारतीय संविधानाची उद्देशिका वितरण केली जाईल. या उपक्रमाद्वारे नागरिकांना संविधान, मूलभूत अधिकार व कर्तव्य यांची माहिती पोहोचविणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे.

या आठवड्यात महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाचे शताब्दी वर्ष मोठ्या थाटात साजरे केले जाईल. त्यानिमित्त व्याख्याने, वक्तृत्व, निबंध व लघुनाट्य स्पर्धा आयोजित केल्या जातील, ज्यातून मानवी हक्कांचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवले जाईल.

कार्यक्रमांची सुरुवात ८ एप्रिलला होईल, ज्यामध्ये पत्रकार परिषद आयोजित करून कार्यक्रमाची माहिती पत्रकारांपर्यंत पोहोचवली जाईल. १० एप्रिलला ग्रामीण व शहरी भागात पथनाट्य व लघुनाटिका आयोजित केल्या जातील. तसेच मार्जिन मनी योजना अंतर्गत लाभार्थ्यांसाठी कार्यशाळा घेण्यात येतील.

११ एप्रिलला महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे द्विशताब्दी वर्ष साजरे केले जाईल. १२ एप्रिलला संविधान जागर उपक्रमांतून नागरिकांना संविधानाची निर्मिती, अनुच्छेद, मुलभूत अधिकार व कर्तव्ये याची माहिती दिली जाईल. तसेच महिला मेळाव्यांत डॉ. आंबेडकरांच्या महिलांसाठी केलेल्या कार्याचे महत्त्व सांगणारे व्याख्यान आयोजित केले जाईल.

१३ एप्रिलला जेष्ठ नागरिकांसाठी जनजागृती शिबिरे आणि नागरिक मेळावे आयोजित केले जातील. तसेच विभागाच्या सहयोगाने सर्व शाळा, महाविद्यालये व आश्रमशाळांमध्ये रक्तदान शिबिरे व स्वच्छता अभियान चालवले जातील. १४ एप्रिलला सामाजिक समता सप्ताहाचे समारोप कार्यक्रम होईल, ज्यामध्ये व्याख्याने, चर्चासत्र व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अभिवादन करण्यात येईल.

शासनाच्या आदेशानुसार प्रत्येक जिल्ह्यात सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कार्यक्रमांची अंमलबजावणी करतील, तर प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण यांचे पर्यवेक्षण राहील. डॉ. हर्षदीप कांबळे, प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन यांनी निर्देश दिले आहेत की, प्रत्येक जिल्ह्यासाठी रु. ३ लक्ष निधी तात्काळ उपलब्ध करावा.

राज्य सरकार या उपक्रमाद्वारे समाजातील दुर्बल घटकांमध्ये सामाजिक समता, न्याय आणि समावेश वाढवण्याचा प्रयत्न करत आहे.

# महागाव तालुक्याला अवकाळीचा तडाखा; रब्बी पिकांचे नुकसान

प्रतिनिधी ३१ मार्च

**महागाव :** गेल्या काही दिवसांपासून जाणवत असलेल्या उकाड्यानंतर सोमवारी सायंकाळी महागाव तालुक्यात अवकाळी पावसानेई जोरदार हजेरी लावली. विजांच्या कडकडाटासह आणि मेघगर्जनेसह झालेल्या या पावसामुळे जनजीवन काही काळ विस्कळीत झाले, तर रब्बी हंगामातील पिकांना मोठा फटका बसला आहे.

दुपारपासून वातावरणात तीव्र उकाडा जाणवत होता. सायंकाळच्या सुमारास आकाशात अचानक काळे ढग दाटून आले आणि विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. शहरातील सखल भागांत पाणी साचले, तर ग्रामीण भागात पावसाचा जोर अधिक असल्याने अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला.

या अवकाळी पावसाचा सर्वाधिक परिणाम काढणीला आलेल्या रब्बी पिकांवर झाला आहे. गहू, हरभरा तसेच भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेतातील उभी उन्हाळी ज्वारीही बाधित झाली आहे. ज्वारीच्या दाण्यांची गुणवत्ता घसरून ते काळे पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पावसामुळे शेतकऱ्यांनी जनावरांसाठी साठवून ठेवलेला हरभरा, तूर कुटार आणि



कडबा ओला झाल्याने चाऱ्याचा प्रश्नही गंभीर होण्याची भीती व्यक्त होत आहे. या अस्मानी संकटामुळे झालेल्या नुकसानीचे महसूल विभागाने तातडीने पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# हनुमान जन्मोत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा

प्रतिनिधी ३१ मार्च

**यवतमाळ :** शहरातील हनुमान आखाडा चौकातील हनुमान मंदिरात २९ मार्च ते २ एप्रिलदरम्यान हनुमान जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला आहे. २९ मार्च रोजी प.पू. महंत अंबिका माता भारती यांच्या हस्ते जन्मोत्सवाचे उद्घाटन उत्साहात पार पडले.

उत्सवानिमित्त दररोज सायंकाळी ६.३० वाजता गुजरात येथील क्षितिज महाराज यांचे श्री हनुमंत भक्ती चरित्र कथन सुरू असून या कथेला भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आध्यात्मिक प्रवचनाचा लाभ घेत आहेत.

२ एप्रिल रोजी सकाळी मंदिरात अभिषेकाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर सायंकाळी ८.३० वाजता रामायण मंडळाच्या वतीने संगीतमय सुंदरकांड पाठ सादर करण्यात येणार आहे. तसेच दुपारी १२ वाजता हनुमान चरित्र कथेस समारोप होऊन भाविकांना प्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. या सर्व कार्यक्रमांचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष ईश्वर राय, वासुदेवराव बाविस्कर, सचिव गोविंद यादव, नंदकुमार बदनोरे व सुभाष यादव यांनी केले आहे.

# अवैध धंद्यांविरोधात आवाज उठवल्याने पत्रकारावर गुन्हे दाखल

प्रतिनिधी ३१ मार्च




**उमरखेड :** अवैध धंद्यांविरोधात आवाज उठवल्याच्या कारणावरून पत्रकारावर गुन्हे दाखल केल्याचा आरोप करत उमरखेड तालुक्यातील पत्रकारांनी संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधित गुन्हे मागे घ्यावेत, अशी मागणी करणारे निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविण्यात आले.

पत्रकार अमित देशमुख यांनी शहर व तालुक्यात सुरू असलेल्या अवैध धंद्यांविरोधात सातत्याने बातम्या प्रसिद्ध केल्या तसेच पोलीस अधीक्षकांकडे तक्रारी केल्या होत्या. याचाच राग मनात ठेवून उमरखेड पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी आकसापोटी त्यांच्याविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. १२ मार्च रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास तक्रारदाराच्या फोनवरून पोलीस ठाण्यात गेलेल्या देशमुख यांच्याविरुद्ध त्याच रात्री उशिरा जातीय तेढ निर्माण करणे, शासकीय कामात अडथळा आणणे आदी आरोपांखाली गुन्हे दाखल करण्यात आले. ही कारवाई पूर्वनियोजित व सूडबुद्धीने केल्याचा दावा पत्रकारांनी केला आहे.

या घटनेमुळे पत्रकारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, अवैध धंद्यांविरोधात बातम्या देणाऱ्या प्रतिनिधींवर दबाव आणण्याचा प्रयत्न होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. त्यामुळे या प्रकरणाची वरिष्ठ पातळीवर चौकशी करून संबंधितांवर योग्य कारवाई करावी आणि देशमुख यांच्यावरील गुन्हे तत्काळ मागे घ्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांच्या मार्फत सादर करण्यात आलेल्या या निवेदनावर साहेबराव धात्रक, संतोष मुडे, सौ. सविता चंद्रे, लक्ष्मीकांत नंदनवार, अरविंद ओझलवार, निळकंठ धोबे, व्यंकटेश पेन्शनवार, गजानन भारती, शैलेश ताजवे, डॉ. विशाल माने, अरुण बेले, भिमराव नगारे, अविनाश मुन्नरवार, अझरउल्ला खान, ज्ञानेश्वर ठाकरे, संभाजी भोयर, वसंत देशमुख, ताहेर मिर्झा, संतोष कलाने, संजय देशमुख, विजय आडे, दत्तात्रय देशमुख, राजू गायकवाड, स्वप्नील मगरे, सुनील ठाकरे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# दिव्यांगांना अनुदान तातडीने द्या; नगरसेवक सैय्यद रियाज यांची मागणी

प्रतिनिधी ३१ मार्च



**आर्णी :** शहरातील दिव्यांग नागरिकांना शासनाच्या विविध योजनांअंतर्गत मिळणारे अनुदान तातडीने वितरित करावे, अशी मागणी नगरसेवक सैय्यद रियाज यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, अनेक पात्र दिव्यांग नागरिकांना अद्याप अनुदानाचा लाभ मिळालेला नाही. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या या घटकांना अनुदान वितरणात होणारा विलंब त्यांच्या दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम करत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

पात्र लाभार्थ्यांचे अर्ज तातडीने मंजूर करून त्यांना शासनाच्या योजनांचा लाभ लवकरात लवकर देण्यात यावा, तसेच संबंधित विभागाने प्रलंबित प्रकरणे त्वरित निकाली काढावीत, अशी मागणी त्यांनी केली आहे. दिव्यांग नागरिकांना वेळेत मदत मिळणे अत्यंत आवश्यक असून प्रशासनाने याबाबत संवेदनशीलतेने भूमिका घ्यावी, असेही त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, नगर परिषद क्षेत्रातील विविध प्रश्नांबाबत सातत्याने पाठपुरावा करताना स्थायी व अस्थायी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन नियमित करून देण्यात यश मिळाल्याचा उल्लेख त्यांनी केला. तसेच बालवाडी कर्मचाऱ्यांचे मानधन वेळेत मिळावे व निवृत्त कर्मचाऱ्यांचे प्रलंबित लाभ मिळवून देण्यासाठीही प्रयत्न करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

प्रशासनाने दिव्यांग नागरिक व कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे सकारात्मक व संवेदनशीलतेने पाहून तात्काळ कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करत पुढेही सर्वसामान्य नागरिक व गरजू घटकांच्या हक्कांसाठी प्रयत्न सुरू राहतील, असे सैय्यद रियाज यांनी स्पष्ट केले.

# बोरगाव ग्रामपंचायतीच्या १५व्या वित्त आयोग निधी खर्चाचा हिशोब द्या

प्रतिनिधी ३१ मार्च

**आर्णी :** तालुक्यातील बोरगाव ग्रामपंचायतीत १५व्या वित्त आयोगाच्या निधीतून करण्यात आलेल्या खर्चाचा सविस्तर लेखी हिशोब द्यावा, अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य निलेश ताराचंद चव्हाण यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी प्रशासक/सरपंच व ग्रामसेवक यांना निवेदन सादर केले.

सन २०२४ ते मार्च २०२६ या कालावधीत झालेल्या खर्चाचा तपशील देण्याची मागणी करण्यात आली असून, ग्रामपंचायत प्रशासनाकडे वारंवार तोंडी पाठपुरावा करूनही समाधानकारक माहिती मिळाली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

गावातील रस्त्यांवरील पोलवरील दिवे मागील दोन महिन्यांपासून बसविण्यात आले नसल्याने नागरिकांना रात्रीच्या वेळी हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. तसेच ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात न घेता ठराव मंजूर करून परस्पर बिले काढली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे आर्थिक गैरव्यवहाराची शंका उपस्थित करण्यात आली आहे.

सरपंचांकडून मनमानी पद्धतीने कारभार सुरू असल्याचा आरोप करत, स्वतःला ठेकेदाराप्रमाणे वागणूक दिली जात असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. बोरगाव ही आर्णी तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायतींपैकी एक असतानाही सध्याची स्थिती दयनीय झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. मार्च २०२४ ते मार्च २०२६ या कालावधीत १५व्या वित्त आयोगाच्या निधीचा संपूर्ण खर्च सात दिवसांत लेखी स्वरूपात सादर करावा, अन्यथा उपोषणाला बसण्याचा इशारा निलेश चव्हाण यांनी दिला आहे. दरम्यान, या निवेदनाच्या प्रती गटविकास अधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांना देखील पाठविण्यात आल्या आहेत.

# सेवा केंद्र चालकांची एकजूट; हक्क संरक्षणासाठी नव्या लढ्याची दिशा

प्रतिनिधी ३१ मार्च



**उमरखेड :** 'आपले सरकार सेवा केंद्र हक्क संरक्षण असोसिएशन, महाराष्ट्र'च्या वतीने आयोजित सर्वसाधारण सभा पार पडली. जिल्हाभरातील सेवा केंद्र चालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सभेच्या प्रारंभी संघटनेची उद्दिष्टे आणि भावी वाटचाल याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सेवा केंद्र चालकांना भेडसावणाऱ्या तांत्रिक अडचणी, प्रशासकीय स्तरावर प्रलंबित असलेल्या मागण्या तसेच हक्क संरक्षण या मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. विविध समस्यांच्या सोडवणुकीसाठी संघटित प्रयत्नांची गरज अधोरेखित करण्यात आली.

व्यासपीठावर संघटनेचे अध्यक्ष यासीन नागाणी, उपाध्यक्ष धनराज पवार, सचिव विशाल मुरादे यांच्यासह सचिन घाडगे, उदय पुंडे, प्रवीण भोयर, मनोज चौधरी, सोनाली जब्बलवार, सचिन गुल्हाने, रविराज ठाकरे आणि किशोर जयस्वाल उपस्थित होते.

सेवा केंद्र चालकांनी एकजुटीने काम केल्यास त्यांच्या समस्या लवकर मार्गी लागू शकतात, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. संघटनेची भूमिका शासनविरोधी नसून शासनाशी समन्वय साधत व्हीएलई (VLE) यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यावर भर असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

संघटनेची व्याप्ती वाढविणे आणि शासनाकडे प्रलंबित प्रश्नांचा सातत्याने पाठपुरावा करणे, याबाबत सभेत सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन किशोर जयस्वाल यांनी केले. या सभेमुळे जिल्ह्यातील सेवा केंद्र चालकांमध्ये नवचैतन्य आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून आले.

# ४ एप्रिलला वनसेवा अमृतमहोत्सव अधिवेशन

प्रतिनिधी ३१ मार्च

**यवतमाळ :** वनसेवा निवृत्त पेंशन असोसिएशनने राज्यस्तरीय वनसेवाव्रतींचा अमृतमहोत्सव, अधिवेशन व आमसभेचे आयोजन शहापूर येथे ४ एप्रिल रोजी केले आहे. उद्घाटन वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रधान मुख्य वनसंरक्षक एम. श्रीनिवास राव तर प्रमुख पाहुणे प्रधान मुख्य वनसंरक्षक वन्यजीव एम. श्रीनिवास रेड्डी, विवेक खांडेकर, अपर मुख्य वनसंरक्षक ऋषीकेश रंजन, मुख्य वनसंरक्षक एन.आर. प्रवीण राहतील. अधिवेशनात निवृत्त अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन अध्यक्ष चंद्रकांत शेळके, महासचिव विनोद देशमुख यांनी केले आहे.

# हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संगम; शिवमहापुराण कथेत मुस्लिम युवकांकडून शरबत वाटप

प्रतिनिधी ३१ मार्च



**आर्णी :** शहरातील सामाजिक आणि धार्मिक ऐक्याची परंपरा अधोरेखित करणारी घटना आर्णीत पाहायला मिळत आहे. हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक म्हणून ओळख असलेल्या या नगरीत शिवमहापुराण कथेदरम्यान मुस्लिम युवकांनी पुढाकार घेत भाविकांना थंड पाणी व शरबत वाटप करत ऐक्याचा संदेश दिला आहे.

आर्णी शहरालगत वाहणाऱ्या अरुणावती नदीच्या तीरावर बाबा कंबलपोष दरगाह, बच्चू बाबा दरगाह तसेच सिद्धेश्वर महादेव मंदिर असून येथे वर्षभर मोठ्या संख्येने हिंदू व मुस्लिम भाविकांची वर्दळ असते. दरवर्षी भरणाऱ्या कंबलपोष उर्सलाही लाखो भाविक उपस्थित राहतात, ज्यातून धार्मिक सलोखा अधोरेखित होतो.

दरम्यान, शहरात आयोजित करण्यात आलेल्या शिवमहापुराण कथेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून, पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या वाणीतील कथाश्रवणासाठी भाविकांची गर्दी होत आहे. उन्हाच्या तीव्रतेच्या पार्श्वभूमीवर भाविकांची तहान भागवण्यासाठी मुस्लिम समाजातील युवकांनी पुढाकार घेत पहिल्याच दिवशी थंड पाणी व शरबताची व्यवस्था केली.

या उपक्रमात आर्णी नगरपरिषदचे आरोग्य सभापती अन्वर पठान, लाला फाजलानी, जावेद सोलंकी, जानी सोलंकी, युनूस शेख यांच्यासह अनेक युवक सहभागी झाले होते. त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. यावेळी रवी नालमवार, पुरुषोत्तम इंगोले आदी उपस्थित होते.

# जिल्हा पशुप्रदर्शनात उमरखेडची झेप

प्रतिनिधी ३१ मार्च



**उमरखेड :** यवतमाळ येथे आयोजित जिल्हास्तरीय कृषी व पशुप्रदर्शनी-२०२६ मध्ये उमरखेड तालुक्यातील पशुपालकांनी दमदार कामगिरी करत विविध गटांमध्ये अव्वल स्थान पटकावले. उत्कृष्ट संगोपन, पालनपद्धती व सुदृढता या निकषांवर झालेल्या स्पर्धेत बैलजोडी, म्हैस, शेळी व कुक्कुट गटांमध्ये उमरखेडच्या स्पर्धकांनी आपली छाप उमटवली.

या यशाबद्दल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांकडून विजेत्या पशुपालकांचा गुलाल उधळून सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी विजेत्यांचे अभिनंदन करत त्यांच्या कष्टाचे कौतुक केले.

स्पर्धेत शेख निसार शे. मतलब (ढाणकी) यांनी शेळी गटात द्वितीय क्रमांक मिळवत ४ हजार रुपयांचे बक्षीस पटकावले. अंकुश सुभाष इसळकर (उमरखेड) यांनी कुक्कुट गटात द्वितीय क्रमांकासह ७ हजार रुपये मिळवले.

सतीश संजय जाधव (उमरखेड) यांनी म्हैस 'ई' गटात द्वितीय क्रमांक मिळवत १५ हजार रुपयांचे पारितोषिक जिंकले, तर पवन विष्णू पोहरकर (उमरखेड) यांनी तृतीय क्रमांकासह १० हजार रुपये मिळवले.

बैलजोडी गटात सतीश वामन मोहिते यांनी प्रथम क्रमांक पटकावत २० हजार रुपयांचे बक्षीस मिळवले. विजय लिंबाजी मोहिते (उमरखेड) यांनी द्वितीय क्रमांकासह १५ हजार रुपये, तर संतोष साहेबराव काळे (धानोरा) यांनी तृतीय क्रमांकासह १० हजार रुपयांचे पारितोषिक मिळवले.

या यशाचा आनंद साजरा करण्यासाठी विजेत्या पशुपालकांनी आपल्या पशूंसह छत्रपती शिवाजी महाराज चौकातून कृषी उत्पन्न बाजार समितीपर्यंत बँडबाजासह भव्य मिरवणूक काढली. वाजतगाजत निघालेल्या या मिरवणुकीमुळे शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
मंगळवार दि ३१ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

प्रधान मंत्री आवास योजना ग्रामीण

# घरकुलाची हमी, अर्धे तुम्ही, अर्धे आम्ही !




## भ्रष्टाचाराचे धोरण, आवास योजना बनली कुरण, खऱ्यांचे मरण

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याचे दिसून येत आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बळ असलेल्या खुल्या प्रवर्गातील गोरगरिबांना प्रथमच घरकुल योजनेत सहभागी करण्यात आले आहे. आणि नेमका याचाच फायदा भ्रष्ट अधिकारी, सबंधित अभियंता पासून ते थेट ग्रामसेवक, रोजगार सेवक आणि स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधी घेत आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बळ असलेल्या गरीब कुटुंबासाठी ही योजना आहे. मात्र भ्रष्ट यंत्रणेने योजनेची वाट लावून टाकली आहे. धनदांडग्या अपात्र लाभार्थ्यांना नियमबाह्य अनुदान वितरित करून पात्र लाभार्थ्यांना केवळ दलाली मिळत नाही म्हणून डावलण्यात आले असल्याची धक्कादायक माहिती हाती आली आहे. अर्धे तुम्ही अर्धे आम्ही या तंत्राचा वापर करून पंचायत समिती स्तरावरिल अधिकारी, सबंधित अभियंता आणि काही रोजगार सेवक व नेमलेले दलाल मालामाल झाले आहेत. भ्रष्टाचाराचे कुरण बनलेल्या या घरकुल योजनेत रिसोड - मालेगांव तालुक्यात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

### लाभासाठी पात्रता काय ? अन् घडतंय काय...

घरकुल योजनेच्या लाभासाठी शासनाने काही निकष लागू केले आहेत. त्या अनुषंगाने लाभार्थी हा ईतर मागास प्रवर्गातील असणे हा महत्त्वपूर्ण निकष आहे. सदर लाभार्थ्याच वार्षिक उत्पन्न १.२० लाखांपेक्षा जास्त नसावं. लाभार्थीच्या वा कुटुंबियांच्या मालकीचे पक्के घर नसावं, जिथं घरकुल बांधायचं ती जागा स्वतःची किंवा शासनाने प्रदान केलेली असावी. सबंधित लाभार्थ्याने शासनाच्या कोणत्याही गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसावा. एकदा लाभ घेतलेली व्यक्ती पुन्हा लाभ घेण्यास अपात्र ठरते. आणि विशेष म्हणजे या योजनेचा लाभार्थी हा प्रधानमंत्री आवास योजनेची ग्रामीण अंतर्गत कायमस्वरूपी प्रतीक्षा यादीमध्ये समाविष्ट नसावा. एव्हढी पारदर्शक नियमावली व निकष असतांना सुद्धा हे सर्व वेशीला टांगून गावागावात बोगस लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असल्याचे वास्तव समोर येत आहे. ही गंभीर बाब गटविकास अधिकाऱ्यांपासून जिल्हापातळीवरील वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती नसावी हेच सर्वात मोठे घरकुल योजनेचे आश्चर्य आहे.



रिसोड तालुक्यातील मोहजाबंदी, कुऱ्हा, मांडवा पासून ते थेट नेतन्सा, केनवड पर्यंत येणाऱ्या सर्वच गाव - खेड्यात घरकुल योजनेचा बोजवारा झाला असल्याचे प्रसिद्ध झालेल्या याद्या बोलत आहेत. हीच बोंब मालेगांव तालुक्यातील ग्रामीण भागात सुद्धा होत आहे. परिणामी अर्धे तुम्ही अर्धे आम्ही अशी खिल्ली उडवल्या जाणाऱ्या रोजगार हमी योजनेची जागा आता घरकुल योजनेने घेतली असल्याचे सामान्य नागरिक बोलत आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बळ असलेल्या ईतर मागासप्रवर्गातील गरिबांना त्यांचे मोडकळीस आलेले कच्चे घर बांधून त्यात मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे हा या योजनेचा स्तुत्य हेतू आहे. त्यासाठी मार्गदर्शक सूचना व निकष सुद्धा लागू करण्यात आले आहेत. मात्र ही सर्व नियमावली धाब्यावर बसून पायदळी तुडविल्या जात असल्याची माहिती समोर येत आहे. तर बऱ्याच ठिकाणी रोजगार सेवकांवर दबाव तंत्राचा वापर करून त्याच्या आयडीचा दुरुपयोग करण्यात आला असल्याची चर्चा होत आहे. सबंधित गावातील अनुदान घेतलेल्या याद्यावर नजर टाकली तर कोणाचेही डोळे विस्फारून जातील एव्हढी लज्जास्पद बाब उघड होत आहे. यात प्रामुख्याने ज्यांच्याकडे मुळातच टोलेजंग घर आहे, ज्यांच्याकडे वीस ते पन्नास एकर जमीन आहे अशा एकत्रित कुटुंबातील अनेक सदस्यांच्या नावावर घरकुल अनुदान देण्यात आले असून जे निकषात बसतात ज्यांना खरोखर नव्या घरकुलाची नितांत गरज आहे अशा गरीब लाभार्थ्यांना मात्र केवळ आर्थिक लोभापाई जाणीवपूर्वक डावलण्यात आले असल्याची बोंब रिसोड, मालेगांव तालुक्यात होत आहे. या गंभीर बाबीकडे योजनेची अंमलबजावणी व संनियंत्रण करणाऱ्या जिल्हापातळीवरील प्रकल्प संचालक आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयातील वरिष्ठांचे दुर्लक्ष होत आहे. परिणामी लाभार्थी पात्र आहे की अपात्र, लाभार्थ्याने घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले की नाही याची कुठलीही खातरजमा न करता थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात अनुदान रक्कम वितरित करण्यात आली आहे. त्यासाठी आकारलेले कमिशन आधीच वसूल करून घेतले जात असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळत आहे.

---

## थोडक्यात

### लिंग गुणोत्तर प्रमाण वाढविण्यासाठी सहकार्य करावे -डॉ अनिल कावरखे



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

कन्याभृणहत्या आणि बिघडते लिंग गुणोत्तर हा समाजासमोरील गंभीर प्रश्न असून, या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्हा प्रशासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि लिंग निवडीस प्रतिबंध घालण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे.

जिल्ह्यातील नागरिकांनी जर लिंग निदान प्रतिबंधक व गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (पीसीपीएनडीटी कायदा) किंवा वैद्यकीय गर्भपात अधिनियम (एमटीपी कायदा) अंतर्गत गर्भलिंग तपासणी करणाऱ्यांविषयी खात्रीशीर माहिती दिली.आणि त्या आधारे गुन्हा उघडकीस आला, तर संबंधित माहितीदारास रु. १ लाखांचे बक्षीस देण्यात येणार आहे.ही योजना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविली जात असून, तिचा उद्देश कन्याभृणहत्या थांबवणे, लिंग गुणोत्तर सुधारणे आणि महिला सक्षमीकरणाला चालना देणे हा आहे. नागरिक, आरोग्य कर्मचारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. आज दि.(३०) रोजी जिल्हा रुग्णालयात पीसीपीएनडीटी जिल्हास्तरीय सल्लागार समितीची बैठक पार पडली. यावेळी जिल्हास्तरीय सल्लागार समिती अध्यक्षा डॉ. अलका मकासरे,जिल्हा शल्य चिकित्सक तथा जिल्हा समुचित प्राधिकारी डॉ. अनिल कावरखे ,ॲड. डॉ .शिवनंदा आम्ले,ॲड जी.डी.गंगावणे डॉ.जया बिबेकर, डॉ.जे.एस. बाहेती, डॉ.गोपाल हेंबाडे, विधी सल्लागार ॲड. राधा नरवलिया आदी उपस्थित होते.

---

## वाशीम जिल्ह्यात जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीत...

# विरोधकांचा चूराळा, विजयी धुराळा !

### वाशीममध्ये धनंजय गोरे मताधिक्याने विजयी

### चंद्रकांत ठाकरे आणि सुरेश मापारी ठरलेत 'किंगमेकर'

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

**रविवारी पार पडलेल्या अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक पदाच्या निवडणूकीत वाशीम तालुक्यातून सहकार क्षेत्रात नवखे असलेले धनंजय गोरे यांचा मताधिक्याने विजय झाला आहे. धनंजय गोरे यांनी त्यांचे हेवीवेट प्रतिस्पर्धी चक्रधर गोटे यांचा पराभव केल्याने वाशीम तालुक्यातील सहकार क्षेत्राला हादरा बसल्याची चर्चा आहे.**





अकोलावाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदासाठी रविवार २९ मार्च रोजी निवडणूक पार पडली.या निवडणूकीत सेवा सहकारी सोसायटी मतदार संघातील एकूण ९९ मतदार होते.त्यापैकी एका मतदाराचे निधन झाल्यामुळे ९८ मतदार या निवडणूकीत चमत्कार घडविणार होते.सहकार व राजकीय क्षेत्राचे बाळकडू असलेले जि.प.चे माजी उपाध्यक्ष चक्रधर गोटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करून प्रतिस्पर्धी उमेदवारासमोर आव्हान उभे केले होते.त्यांचे विरोधात वाशीम तालुक्यातील सोनखास येथील धनंजय गोरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.धनंजय गोरे यांनी त्यांचा गट सचिव पदाच्या नोकरीचा राजीनामा देवून सहकार क्षेत्रात उतरण्याचे धाडस केले होते.एकीकडे सहकार क्षेत्रात नवखे असलेले धनंजय गोरे तर दुसरीकडे हेवीवेट आणि अनुभवी उमेदवार चक्रधर गोटे असल्याने प्रारंभी ही निवडणूक एकतर्फी होईल असा जाणकारांचा अंदाज होता. सुरूवातीला चक्रधर गोटे यांना ९८ पैकी ७३ मतदान होण्याचा दावा त्यांचे समर्थक करत होते.त्याचवेळी नवखे उमेदवार आपल्या विजयासाठी मातब्बर व अनुभवी मंडळीचे आशीर्वाद घेवून आपली रणनीती आखत होते. नवखे असलेले धनंजय गोरे यांना शिवसेना उबाठाचे जिल्हाप्रमुख सुरेश मापारी आणि जि.प.चे माजी अध्यक्ष ,राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते चंद्रकांत ठाकरे यांचे मार्गदर्शन व आशीर्वाद लाभले.या दोन्ही अनुभवी नेत्यांनी त्यांचे 'विजयी चक्र' वेगाने फिरवून रविवारी पार पडलेल्या वाशीम तालुक्याच्या संचालक पदाच्या निवडणूकीत आपली चाणाक्यनीती वापरली. सोमवार ३० मार्च रोजी या निवडणूकीची मतमोजणी करण्यात आली. या अटीतटीच्या व अस्तित्वाच्या निवडणूकीत वाशीम तालुक्यातील चाणाक्ष मतदारांनी धनंजय गोरे यांच्या पारड्यात ६५ मतदान टाकले.तर सर्वांगिण दृष्ट्या वजनदार असलेले चक्रधर गोटे यांना ३३ मते देवून मताधिक्याने पराभूत करून 'चमत्कार' घडवून आणला. ही निवडणूक प्रारंभी गोटेंना एकतर्फीच वाटत होती.परंतु गोटे यांना वाशीम बाजार समितीची निवडणूक,बाजार समिती मधील नोकरभरती प्रकरण भोवले.राजकीय व सहकार क्षेत्रात त्यांचेसोबत असलेले अनेक जन या निवडणूकीपासून अलिप्तच राहिले. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नवनियीक्त संचालक धनंजय गोरे यांच्या विजयाने प्रस्थापित सहकार नेत्यांना हादरा बसल्याची चर्चाआहे. किंगमेकर असलेले चंद्रकांत ठाकरे आणि सुरेश मापारी यांनी या निवडणूकीत चाणाक्यनीती वापरून वाशीम तालुक्यातील सहकार व राजकीय क्षेत्रामध्ये नवीन समीकरण उदयास आणले.या विक्रमी विजयाबद्दल नवनियुक्त बँक संचालक धनंजय गोरे यांचे विविध स्तरातून अभिनंदन करण्यात आले.



### ठाकरे, झनक, जाधव, इंगोले विजयी...

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदाच्या निवडणुकीत रिसोड, मालेगाव व मंगरूळपिर तालुक्यांत प्रस्थापितांनी आपला गड कायम राखला, तर वाशिम तालुक्यात धक्कादायक निकाल लागला, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष चक्रधर गोटे यांना पराभवाचा सामना करावा लागला तसेच कारंजा येथे माजी बँक उपाध्यक्ष श्रीधर कानकिरड यांच्या पत्नी रत्नमाला कानकिरड यांचाही पराभव झाला.

सोमवारी (दि. ३० मार्च) अकोला येथे मतमोजणी पार पडली. रिसोड तालुक्यात सेवा सहकारी सोसायटी मतदारसंघात आमदार अमित झनक यांच्या मातोश्री शोभा सुभाषराव ज्ञानक यांनी ५९ मते मिळवत विजय मिळविला. प्रतिस्पर्धी डॉ. विठ्ठल गजानन पाचरणे यांना १३ मतांवर समाधान मानावे लागले. दोन मते अवैध ठरली. बहुमताने विजय मिळवत झनक यांनी बालेकिल्ला कायम ठेवण्यात यश मिळविले. मालेगाव तालुक्यात नितीन दिलीप जाधव यांनी ३७ मते मिळवत विजय मिळवला. गोपाल पाटील राऊत यांना २८, तर प्रकाश पाटील कुटे यांना २२ मते मिळाली. यापूर्वी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष दिलीप जाधव यांनी विजय मिळविला होता. यावेळी पुत्र नितीन यांना निवडून आणत जाधव यांनी आपले वर्चस्व कायम राखले, मंगरुळपीर तालुक्यात रामेश्वर सुभाष ठाकरे यांनी ५१ मते मिळवत विजय मिळविला.

प्रतिस्पर्धी संजीवनी राऊत यांना १५ मते मिळाली. माजी राज्यमंत्री सुभाषराव ठाकरे यांनी या विजयातून आपले वर्चस्व कायम राखले. मानोरा तालुक्यात सेवा सहकारी सोसायटी मतदारसंघातून माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अरविंद पाटील इंगोले हे यापूर्वीच अविरोध निवडून आले होते.

---

## आयपीएल क्रिकेट सट्ट्याची धूम...

# अवैध धंद्यांची खेळी, अनेकांचे जातात बळी !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे यांनी धंदे बंद करण्याचे आदेश दिले. अनेक ठिकाणी अवैध धंद्याविरूध्द कारवाई होत आहे. मात्र कारवाया नंतरही जिल्ह्यात अवैध धंदे खुलेआम सुरूच असून बंदचे मात्र नावच आहे. नावालाच बंदी असून कारवाई करूनही अवैध धंद्यावाले याची संधी करीत आहेत. आयपीएल क्रिकेटच्या सट्ट्याची धूम वाशीम, कारंजा, मानोरा, मालेगाव, मंगरूळपीर, रिसोड सह जिल्ह्यात ठिकठिकाणी सुरू आहे. शहरातील अवैध धंदे आता ग्रामीण भागात पोहोचले असून अवैध धंद्याची कलाच न्यारीच असून त्यात पोलिसांची भागेदारी सुरू आहे. अवैध धंद्यांच्या खेळीने मात्र, अनेकांचे बळी जात आहेत.

### शहरात आयपीएल क्रिकेटचा सट्टा, ग्रामीण भागात अवैध धद्यांने लावला बट्टा

**आयपीएल क्रिकेट सुरू झाल्यापासून वाशीम शहरासह मंगरूळपीर, कारंजा, मालेगाव, रिसोड येथे सट्ट्याचे मोठ्याप्रमाणात पेव फुटले आहे. शहरातील हे धंदे आता ग्रामीण भागात सुरू झाले आहेत. शहरापुरता असलेला क्रिकेट सट्टा व अवैध धंदे आता ग्रामीण भागात सुरू आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवन उध्दवस्त होत आहे.**

जिल्ह्यासह वाशीम शहरात आयपीएलवर क्रिकेटवर सट्टा लावल्या जात आहे. शहरातील सट्ट्याकडे पोलिसांचे अर्थपुर्ण दुर्लक्ष असून पोलिसांमुळेच सट्ट्याला बट्टा लागलेला आहे. जिल्हा पोलिस अधीक्षकांचे बंदचे आदेश आदेश झुगारून जिल्ह्यात ठिकठिकाणी अवैध धंदे सुरू आहेत. अवैध प्रवाशी वाहतुकीचाही कळस गाठला आहे.

रस्त्यावर नावालाच वसुलीसाठी पोलिस उभे आहेत. जीवनाची लढाई दारूमुळे नागरिक हारत आहे. अवैध दारू वाहतुकीसाठी लहान मुलांचा वापर होत आहे. ग्रामीण भागात देशी दारूच्या भट्ट्या उभारल्या आहेत. ज्यादा दराने बनावट दारूची विक्री सुरू आहे. गुटख्याला रेड सिंग्नल असतांना जिल्ह्यात मात्र ग्रिन सिंग्नल मिळत आहे. जिल्हा हे अवैध गुटख्याचे हब बनले आहे.त्यामुळे अवैध धंदे बंद करून आपल्या विभागातील फितूर पोलिस अधिकारी व कर्मचारी शोधून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी होत आहे. कारण अवैध धंद्यांच्या खेळीने अनेकांचे बळी जात आहेत.



---

## तंटामुक्ती ग्राम अभियानाला अवैध धंद्यामुळे ग्रहण !

### *शासनाचे उद्दिष्ट कसे पूर्ण होणार *नियम न पाळता स्थापन झाल्या समित्या

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

शांततेकडून समृद्धीकडे जाण्याची वाट हेच उद्दिष्ट गाव तंटामुक्त होण्यासाठी शासनाने ठेवले आहे. तंटामुक्त समिती कशी असावी, समितीचा अध्यक्ष कोण व कसा असावा, समितीमध्ये कोणाकोणाला समजावून घ्यावे, त्याचे सर्व निकष शासनाकडून निश्चित करण्यात आले.




त्यानुसार काही गावातच फक्त हे निकष पाळल्या गेले, मात्र बऱ्याच गावात या निकषाच्या विरोधात केवळ मर्जीतले व कायद्याचे ज्ञान नसलेले लोक एकत्रित येऊन समित्या स्थापन केल्या. अनेक गावात सत्ताधारी पॅनलच्या कार्यकर्त्यांचा या समितीत भरणा केला आहे. अशा स्थितीत तंटामुक्ती समितीकडून तंटे कसे सुटणार, हा असा प्रश्न नागरिक करीत आहेत. राज्य शासनाने १५ ऑगस्ट२००७ पासून अत्यंत गाजावाजा करून महात्मा गांधी तंटामुक्त अभियान सुरू केले. या योजनेला भावनिक दृष्ट्या महत्व यावे म्हणून संपूर्ण विश्वाला संदेश देणारे महात्मा गांधी यांचे नाव देण्यात आले. गावागावात शांतता नांदावी, बंधुभाव निर्माण व्हावा ,जातीय सामाजिक तेढ कमी व्हावी व गावचा सर्वांगीण विकास साधला जावा. या हेतूने राज्य शासनाने महात्मा गांधी तंटामुक्त अभियान सुरू केले. गावागावात तंटामुक्त समिती स्थापन करण्यात आल्या. योजना सुरू होऊन गावात तंटामुक्त समित्या स्थापन झाल्या. तरी पश्चात मात्र काही गावात अवैध धंदे सुरू असल्याची वस्तू स्थिती असल्याने गावे तंटामुक्त कशी होणार ? असा प्रश्न ग्रामस्थ करीत आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# वादळी वाऱ्यासह शहराला पावसाचा तडाखा

## ◆जोरदार वाऱ्याने नागरिकांची तारांबळ ◆ बाभुळगाव जहांगीर मध्ये झाडावर पडली वीज

प्रतिनिधी ३१ मार्च

**अकोला :** शहरात सोमवारी रात्री वातावरणाने अचानक कूस बदलली. प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तविलेल्या अंदाजानुसार, शहराच्या विविध भागांत वेगाने वाहणारे वारे आणि विजांच्या कडकडाटासह पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या. यामुळे उकाड्याने हैराण झालेल्या अकोलेकराना काहीसा दिलासा मिळाला असला, तरी अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले. वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे शहरातील काही भागांत झाडांच्या फांद्या पडण्याच्या आणि घरांवरील पत्रे उडण्याच्या घटना घडल्या.



### वातावरणात अचानक बदल

सोमवारी दिवसभर कडक ऊन आणि उकाडा जाणवत असतानाच, संध्याकाळी सहा नंतर आकाशात ढगांची दाटी झाली. त्यानंतर काही वेळातच शहरात जोरदार वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. हवामान विभागाने जारी केलेल्या इशाऱ्या नंतर अवघ्या काही वेळातच निसर्गाचा हा प्रकोप पाहायला मिळाला.

### हवामान खात्याच्या माहितीनुसार पुढील खबरदारीचे आवाहन

अकोला जिल्ह्यासह वाशिम आणि बुलढाणा जिल्ह्यांतही अशाच प्रकारची स्थिती निर्माण झाली होती. पावसाच्या हजेरीमुळे तापमानात घट होऊन हवेत गारवा निर्माण झाला. मात्र, पुढील २४ तासांत पुन्हा अशाच प्रकारच्या स्थानिक हवामान बदलाची शक्यता नाकारता येत नसल्याने नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे

### शहरात पावसामुळे अनेक ठिकाणी अंधाराचे साम्राज्य

अचानक आलेल्या पावसाने काही ठिकाणी तांत्रिक बिघाडामुळे वीजपुरवठा खंडित झाला होता. विशेषतः महावितरणच्या कर्मचाऱ्यांना रात्रीच्या वेळी वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी कसरत करावी लागली. शहरातील मध्यभागी असलेल्या पेट्रोल पंपावर जनरेटरची व्यवस्था नसल्याने अनेकांना वीज येईपर्यंत पेट्रोल भरण्यासाठी वाट पाहावी लागली.

### बाभूळगाव जहांगीर मध्ये वीज पडल्याने झाडाने घेतला पेट



अकोला तालुक्यातील बाबुळगाव जहागीर येथे अचानक आलेल्या पावसाच्या वातावरणात वीज कोसळल्याची घटना घडली भाऊराव लक्ष्मणराव ढोमणे यांच्या शेतातील धुऱ्यावर असलेल्या बांबूच्या झाडावर वीज पडल्यामुळे आग लागली होती सुदैवाने मोठी दुर्घटना टाळली या घटनेमुळे काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते मात्र स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवत आग आटोक्यात आणली या आगीत कोणतेही मोठे नुकसान झाले नाही पावसामुळे परिसरातील विद्युत पुरवठा पाच तास खंडित झाला होता त्या वीज पडल्याच्या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे









## जन्मकल्याणक भव्य शोभायात्रेने वेधले सर्वांचे लक्ष



◆ स्वर्णरथावर विराजमान भगवान महावीर

**अकोला :** जैन समाजाचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांचा २६२५ वा जन्मकल्याणक महोत्सव मंगळवारी शहरात उत्साहात साजरा करण्यात आला. सकल जैन समाज यांच्या वतीने भगवान महावीर स्वामींची भव्य रथयात्रा काढण्यात आली.

# वहदत-ए-इस्लामी हिंद, अकोला तर्फे आयोजित 'दावत-ए-शीरखुरमा' कार्यक्रम यशस्वी; मान्यवरांकडून कौतुक



प्रतिनिधी ३१ मार्च

**अकोला** :आपसी भाईचाऱ्याचा सुंदर संदेश देत वहदत-ए-इस्लामी हिंद, अकोला यांच्या वतीने आयोजित 'दावत-ए-शीरखुरमा' कार्यक्रम आज यशस्वीरीत्या पार पडला. तेलीपुरा रोड येथील नगीना मशिद परिसरात आयोजित या स्नेह मेळाव्यात शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर नागरिकांनी उपस्थिती लावली.

**भाईचाऱ्याचा अनोखा संगम**


रमजान ईदच्या पवित्र निमित्ताने आयोजित या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश समाजात शांतता, सौहार्द आणि प्रेमाचा संदेश पोहोचवणे हा होता. सकाळी ११ वाजल्यापासूनच पाहुण्यांची ये-जा सुरू झाली होती. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी येणाऱ्या सर्व पाहुण्यांचे मनापासून स्वागत करून त्यांना ईदची खास मिठाई 'शीरखुरमा' दिली. सर्वांनी शीरखुरम्याचा मनसोक्त आस्वाद घेतला. या कार्यक्रमात शहरातील सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांसह सामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. उपस्थित वक्त्यांनी सांगितले की, अशा प्रकारचे कार्यक्रम समाजातील दुरावा कमी करून परस्पर विश्वास वाढवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. अनेकांनी प्रथमच मशिदीत येऊन आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाचे मुख्य वक्ते मा. अब्दुल वहाब मलक साहेब यांनी रमजान रोज्याचे महत्त्व स्पष्ट करत इस्लामच्या मूलभूत तत्त्वांबद्दल — एकेश्वरवाद, प्रेषितवाद आणि मृत्यूनंतरचे जीवन — मार्गदर्शन केले. पाहुण्यांना मशिदीची माहितीही देण्यात आली. वहदत-ए-इस्लामी हिंद, अकोला यांच्या टीमने कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उत्तम नियोजन केले होते. संस्थेच्या कार्यकर्त्यांनी शिस्तबद्ध आणि सेवाभावी वृत्तीने सर्व पाहुण्यांची व्यवस्था केली. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून शहराच्या सुख-शांतीसाठी प्रार्थना केली.

# ऑटो बंद झाल्याने कसे जायचे शाळेत ?

प्रतिनिधी ३१ मार्च

## विद्यार्थी व पालकांसमोर मोठा प्रश्न

शहरातील गॅसच्या तुटवड्यामुळे अनेक शालेय विद्यार्थ्यांना अडचणी निर्माण झाल्या आहेत. शहरातील अनेक शाळांमध्ये शेकडो विद्यार्थी दररोज ऑटो-रिक्षाने प्रवास करतात. शहरात गॅस चा पुरवठा करणारे दोन पंप आहेत. परंतु हे दोन्ही पंप बंद पडले आहेत. यामुळे ऑटो-रिक्षा चालकांना आपल्या मुलांना शाळेत पोहोचवणे कठीण झाले. सोमवारी सकाळी शाळा पुन्हा सुरू झाल्यावर, मुलांना सोडायला आलेल्या



ऑटो-रिक्षा चालकांनी गॅस पुरवठा पूर्ववत झाल्याशिवाय सेवा देऊ शकणार नसल्याचे जाहीर केले.

**पालक ही करत आहेत अडचणींचा सामना**

विद्यार्थ्यांचे अनेक पालक रोजंदारीवर काम करणारे मजूर आहेत. तर काही पालक नोकरदार आहेत. त्यांना दररोज मुलांना शाळेत सोडणे शक्य होत नाही. शालेय व्यवस्थापनाच्या बस उपलब्ध आहेत परंतु त्याचे भाडे पालकाच्या आवाक्या बाहेर आहेत. ऑटो चालकांनी हात वर केल्यानंतर मुलांना सकाळी शाळेत पाठवावे की आपल्या नोकरी व कामधंद्यासाठी जाण्याची तयारी करावी हे मोठे संकट पालकांसमोर उभे ठाकले आहे. जागतिक परिस्थितीमुळे, पेट्रोलच्या संकटाचा परिणाम आता स्थानिक पातळीवर जाणवत आहे. याचे परिणाम विद्यार्थ्यांच्या भविष्यावर थेट परिणाम करू शकतात.

### गॅस नसल्यामुळे ऑटो रिक्षा चालकांनी केले हात वर विद्यार्थ्यांचे पालक चिंतेत

◆ऑटो-रिक्षा चालक पूर्वी प्रति लिटर १०० रुपये दराने गॅस भरत असत, जो भाव आता १२०-१२५ रुपयांवर पोहोचला आहे. भाव वाढ झाली असली तरी शहरातील दोन्हीही गॅस पंपांवर गॅस उपलब्ध नसल्याने दोन्हीही पंप बंद पडले आहेत. त्यामुळे ऑटो कसा चालवावा याची चिंता ऑटो चालकांना पडली आहे

# कस्तुरबा गांधी विद्यालयाची विद्यार्थीनी हिंदी प्रवेश परीक्षेत भारतातून प्रथम

प्रतिनिधी ३१ मार्च

**हिवरखेड:** स्थानिक कस्तुरबा गांधी विद्यालयाची दहावीची विद्यार्थीनी सुप्रिया आनंद धुंदे रा.हिंगणी हिने राष्ट्रभाषा प्रचार समिती वर्धा द्वारे घेण्यात आलेल्या हिंदी प्रवेश परीक्षेमध्ये भारतातून प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. त्याबद्दल वर्धा येथे झालेल्या ३५ व्या दीक्षांत समारंभामध्ये तिला पदक, प्रमाणपत्र ,व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले.

त्यामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे तिने आपल्या यशाचे श्रेय आई वडील , व शिक्षक वृंद यांना दिले आहे, तिला हिंदी



विषयाच्या मार्गदर्शक शिक्षिका अनुराधा भारसाकडे मॅडम, मुख्याध्यापक प्रशांत खंडारे सर, वसंत गीते यांचे मार्गदर्शन मिळाले आहे, तिच्या यशाचे त्याचे कौतुक शिक्षण संस्था अध्यक्ष श्रीकृष्ण गावंडे, सचिव, गजानन पाचबोले व शाळा समिती अध्यक्ष डॉ. अजय मानकर यांनी केले आहे.

# नंदकिशोर त्रिवाड यांना मातृशोक

प्रतिनिधी ३१ मार्च

**अकोला :** जठारपेठेतील योगायोग मेडिकल्सचे संचालक नंदकिशोर त्रिवाड यांच्या मातोश्री शोभा वसंतराव त्रिवाड यांचे वयाच्या ९८ व्या वर्षी



वृध्दापकाळाने निधन झाले. दिवंगत डॉ. वसंतराव त्रिवाड यांनी अनेक वर्षे पातुर येथे वैद्यकिय व्यवसाय आणि नगर परिषदेत प्रतिनिधीत्व केले होते. शोभा त्रिवाड यांच्या पश्चात दोन मुली, जावई, मुलगा नंदकिशोर, सुन आणि नातवंड असा मोठा परिवार आहे. आज त्यांच्यावर उमरी हिंदू स्मशानभूमीत सकाळी अंत्य संस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येत उपस्थिती होती.

# गुप्ता पाईल्स हॉस्पिटलचे नवीन वास्तूत स्थानांतर

प्रतिनिधी ३१ मार्च

## ♦ कार्यक्रमाला मान्यवर अतिथींची उपस्थिती


**अकोला :** गेल्या १७ वर्षांपासून रुग्णांची अविरत सेवा करणाऱ्या 'गुप्ता पाईल्स हॉस्पिटल' आणि 'डॉ. विनीताज् होमिओपॅथी वेलनेस क्लिनिकचे स्थलांतर नवीन वास्तूत झाले. ब्रिजलाल गुप्ता, सौ. इंदिरा गुप्ता, रमेशचंद्र गुप्ता, सौ. गंगोत्री गुप्ता यांच्या हस्ते शानदार शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. एमडीपी राजा हैद्राबाद, डॉ. कमलकिशोर लड्ढा, डॉ. सुनिता लड्ढा, नीमा चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. आशुतोष कुळकर्णी, डॉ. आशिष चांडक आदि मान्यवर उपस्थित होते.

पाईल्सच्या (मूळव्याध) रुग्णांसाठी 'गुप्ता पाईल्स हॉस्पिटल' हे नाव अत्यंत विश्वसनीय आहे. आतापर्यंत शेकडो रुग्णांनी येथे उपचार घेऊन शतप्रतिशत निरोगी आयुष्य मिळवले आहे. केवळ अकोला जिल्हाच नव्हे, तर शेजारील जिल्ह्यांतूनही रुग्ण मोठ्या विश्वासाने



येथे उपचारासाठी येतात आणि व्याधीमुक्त होऊन परततात.

डॉ. पंकज गुप्ता यांचे गुप्ता पाईल्स हॉस्पिटल आणि त्यांच्या पत्नी डॉ. विनीता गुप्ता यांचे 'डॉ. विनीताज् होमिओपॅथी वेलनेस क्लिनिक' आता रामनगर परिसरातील हॉटेल सेंटर प्लाझाच्या मागे आणि देवकमल हॉस्पिटलच्या जवळ, सर्व आधुनिक सुविधांनी सज्ज अशा नवीन इमारतीत स्थलांतरित झाले आहे. या रुग्णालयाचे उद्घाटन अकोला शहर आणि पातुरदा येथील प्रतिष्ठित




नागरिक, व्यावसायिक आणि वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. याप्रसंगी यवतमाळचे प्रसिद्ध शल्यचिकित्सक डॉ. आलोक गुप्ता यांची विशेष उपस्थिती होती. दोन आधुनिक ऑपरेशन थिएटर आणि लेझर मशीन १० बेडचे सुसज्ज रुग्णालय आणि मल्टी-पॅरा मॉनिटर सुपर डिलक्स एसी रूम, डिलक्स एसी रूम आणि स्पेशल रूम, प्रशस्त जनरल वॉर्ड आणि वाय-फाय सुविधा, ईसीजी आणि पॅथॉलॉजी लॅब सुविधा, व्हिडिओ प्रोक्टोस्कोपी आणि इन-हाऊस मेडिकल स्टोअर, प्रशस्त वातानुकूलित प्रतीक्षालय आणि ३ ओपीडी केबिन, रुग्णांसाठी लिफ्ट आणि प्रशस्त पार्किंग व्यवस्था, आधुनिक आयुर्वेदिक व होमिओपॅथिक औषधे उपलब्ध. 'गेल्या १७ वर्षांपासून आम्ही रुग्णांची अविरत सेवा करत आहोत. यापुढेही या आधुनिक रुग्णालयाच्या माध्यमातून आम्ही किफायतशीर दरात रुग्णांना अद्ययावत वैद्यकीय सेवा देऊन, त्यांना आजारातून मुक्त करण्यासाठी पूर्णतः प्रयत्नशील राहू असे डॉ. पंकज गुप्ता म्हणाले.

# कोतवाली नजीकच्या पुलावरील पथदिवे बंद

प्रतिनिधी ३१ मार्च

**अकोला :** सिटी कोतवाली चौक नजीकच्या पुलावरील पथदिवे तीन महिन्यापासून बंद आहेत. रात्रीच्या वेळी वाहन चालकांना चाचपडत वाहने चालवावी लागतात. महत्त्वाच्या रस्त्यावर रात्रंदिवस रहदारी असते. परंतु तरीही या



भागात पथदिवे सुरू करण्याकडे महापालिका विद्युत विभागाला वेळ नाही. या विषयी नागरिक नाराजी व्यक्त करीत आहेत. तीन महिन्यांपासून पथदिवे बंद असूनही ते सुरू व्हावे म्हणून लक्ष दिले जात नाही. यावरून महापालिका यंत्रणा कशी काम करत आहे हे दिसून येते. मात्र दिरंगाईचा नागरिकांना त्रास सहन करावा लागतो आहे. मुख्य रस्त्यावरील पथदिव्यांची ही स्थिती आहे तर शहरातील अन्य भागात काय अवस्था असेल याविषयी आश्चर्य व्यक्त केले जात आहे. महापालिका प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष द्यावे. तसेच होणारी अडचण दूर करावी अशी मागणी आहे.

# बार्शीटाकळी नगरपंचायत च्या विरोधी पक्ष नेतेपदी रमेश वाटमारे यांची निवड



प्रतिनिधी ३१ मार्च

**बार्शीटाकळी :** नगरपंचायत मधे आज झालेला सर्वसाधारण सभेमध्ये नगरपंचायत च्या विरोधी पक्षनेतेपदी भाजपा चे जेष्ठ नगरसेवक श्री रमेश वाटमारे यांची एकमताने निवड करण्यात आली त्यावेळी सर्व पक्षीय नगरसेवकांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्या दिल्या.. त्या वेळेस मुख्याधिकारी व नगराध्यक्ष व सर्व नगरसेवक उपस्थित होते

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK